www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

दैं. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक – सौ भारती संतोष आमले उपसंपादक – श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक – श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक – श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 262 वा शनिवार दि. 07 जून २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

# मनसेसोबतच्या युतीवर उद्धव ठाकरेंचं विधान देवेंद्र फडणवीसांनी ३ शब्दातच भाष्य केले

नागपूर – अवघ्या महाराष्ट्रात सध्या ठाकरे बंधू एकत्र येण्यावरून विविध चर्चा सुरू आहेत. त्यातच आजच्या पत्रकार परिषदेत उद्धव ठाकरे यांनी राज ठाकरेंसोबतच्या युतीवर जे महाराष्ट्राच्या मनात आहे, ते होईल असं सांगत सूचक विधान केले. त्यामुळे मनसे–उद्धवसेना एकत्र येण्याच्या चर्चेला बळ मिळाले. राज्यातील या मोठ्या घडामोडीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ३ शब्दातच भाष्य केले. ठाकरे बंधूंबाबत पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावर मुख्यमंत्र्यांनी माझा काय संबंध असं बोलून त्यावर फारसे बोलणे टाळले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, उद्धव ठाकरेंच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया ही राज ठाकरे देतील. मी कशी प्रतिक्रिया देणार? माझा काय संबंध येतो. त्यामुळे ते आपापसात ठरवतील. कुणी साथ द्यायची, कुणी प्रतिसाद द्यायचा. कुणी द्यायचा नाही. त्यात पत्रकारच जास्त तारे तोडून राहिलेत. त्या दोघांपेक्षा जास्त माहिती तुमच्याकडे आहे हा सगळ्यात मोठा प्रॉब्लेम आहे, पण काही हरकत नाही. माध्यमांचे ते कामच आहे. आतातरी यावर प्रतिक्रिया देण्यासारखे काय आहे असं मला वाटत नाही असं त्यांनी सांगितले. तसेच माझा राजकीय अनुभव मी वारंवार सांगत नसतो, मी तो योग्य वेळी सांगतो. त्यामुळे उचित वेळी मी सांगेन असंही त्यांनी म्हटलं.





**काय म्हणाले उद्धव ठाकरे?**

मनसेसोबतच्या युती चर्चेवर उद्धव ठाकरे यांनी पत्रकारांना उत्तर दिले. जे महाराष्ट्राच्या जनतेच्या मनात आहे ते होईल. त्याबद्दलचे बाकीचे जे काही बारकावे आहेत ते आमचे आम्ही बघत आहोत. शिवसैनिकांच्या मनात कुठेच संभ्रम नाही. त्यांचे जे सैनिक संपर्कात आहेत, त्यांच्याही मनात संभ्रम नाही. संदेश देण्यापेक्षा लवकरच जी काही बातमी द्यायची आहे ती देऊ असं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं.

**मनसेची भूमिका काय?**

दरम्यान, युतीच्या चर्चेबाबत जो काही निर्णय घ्यायचा तो राज ठाकरे घेतील. ज्यावेळी ठोस गोष्ट होईल. प्रस्ताव येईल तेव्हा त्यावर योग्य तो निर्णय घेतला जाईल. आता जे महाराष्ट्राच्या जनतेच्या मनात आहे ते होईल असं उद्धव ठाकरे म्हणाले परंतु २०१४, २०१७ सालीही जनतेच्या मनात होते पण उद्धव ठाकरेंच्या मनात नव्हते. त्यामुळे उद्धव ठाकरेंच्या मनात काय हे जास्त महत्त्वाचे आहे. जनतेच्या मनातलं आम्हाला माहिती आहे. ते जर म्हणतायेत बातमी देऊ, तर त्या बातमीची आपण सगळे वाट पाहू अशी प्रतिक्रिया मनसे नेते संदीप देशपांडे यांनी उद्धव ठाकरेंच्या विधानावर दिली.

## दृष्य सत्य

### जनतेच्या नजरेतून शासनाच्या दरबारात

**"स्वच्छतागृह स्वच्छ ठेवा, आरोग्य सुरक्षित ठेवा" संदेशाचा ग्रामपंचायत आसडी (ता.सिल्लोड) ला विसर.**



दैनिक युवक आधार प्रतिनिधी
:- योगेश पालोदकर

**ग्रामपंचायत स्वच्छतागृहाच्या अस्वच्छ दुर्गंधीमुळे लोक हैराण, ग्रामपंचायतीने तातडीने साफसफाई करावी नागरिकांची मागणी.**

# कडूंचा मोहरा’ झळकतोय क्रिकेटच्या मैदानात!

## रायगड संघात जिज्ञासाची दणदणीत एन्ट्री!

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

न्हावे खाडीच्या लाटांवरून झेपावत कडू कुटुंबातल्या जिज्ञासा नित्यानंद कडू हिनं थेट रायगड क्रिकेट असोसिएशनच्या संघात यष्टीरक्षक म्हणून धडाकेबाज प्रवेश केला आहे. लहान गावातून आलेल्या या जिद्दी खेळाडूचं नाव आज संपूर्ण रायगडात दुमदुमतंय आणि कडू कुटुंबाच्या मातीला सोन्याची किनार लाभली आहे. जिज्ञासाचा जन्म न्हावे खाडी या छोट्याशा खेडेगावातला. क्रिकेटची आवड लहानपणापासूनच अंगी भिनलेली, आणि तिला साथ लाभली आई–वडिलांची. त्यांनी तिच्या स्वप्नांना परवानगीच नव्हे तर पंख दिले. क्रिकेटच्या नेटमध्ये घाम गाळताना, शैक्षणिक पुस्तकांवरही तिचं लक्ष होतंच वर्गात पहिला–

**दुसरा**
**नंबर कायम तिचाच!**

शिवाजीनगर क्रिकेट अ‍ॅकॅडमित तिनं क्रिकेटचे धडे गिरवायला सुरुवात केली आणि पाहता पाहता



मैदानावर तिचा जलवा प्रस्थापित झाला. यष्टीमागे वाघिणीसारखी सजग, क्षेत्ररक्षणात वीजेसारखी वेगवान आणि आत्मविश्वासात कुठेही कमी नाही. अशा दर्जेदार कामगिरीच्या जोरावर जिज्ञासाची निवड रायगड क्रिकेट असोसिएशनच्या संघात झाली.

याबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी जिज्ञासा व तिला मार्गदर्शन करणारे प्रशिक्षक मनोज लोखंडे यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी जेष्ठ नेते वाय. टी. देशमुख, ग्रामपंचायत सदस्य सागर ठाकूर, म्हसेशवर मंदिर कमिटीचे अध्यक्ष सी. एल. ठाकूर व जिज्ञासाचे आईवडील उपस्थित होते.

कडू कुटुंबीय विविध क्षेत्रांत ठसा उमटवणारे पण क्रिकेटसारख्या खेळातला हा पहिलाच झगमगता तारा! आता मात्र, कडूंचा मोहरा मैदानात उतरला अशीच चर्चा गावागावात रंगली आहे. अभ्यासातही बाजी मारत, खेळातही झेंडा फडकावणाऱ्या जिज्ञासाला राष्ट्रीय संघात पोहोचवण्याचं स्वप्न तिचं कुटुंब बाळगून आहे. या जिद्दी खेळाडूला खेळ आणि शिक्षण दोन्हीतही झेंडा फडकवताना पाहणं, हे केवळ कडू कुटुंबासाठी नाही, तर संपूर्ण रायगडसाठी अभिमानाचं कारण ठरतंय.

# अनिरुद्ध खोतकर यांच्या हस्ते आयपीएस आकाश गोरे यांचे अभिनंदन

**दैनिक युवक आधार**
**मराठवाडा विभागीय**
**संपादक :प्राचार्य जगन्नाथ रासवे**

जालना जिल्ह्यातील भाटेपुरी गावच्या

आकाश पुंजाराम गोरे या सामान्य कुटुंबात जन्मलेल्या तरुणाने #UPSC पपरीक्षेतून #IPS या पदावर नियुक्ती झाल्याबद्दल दर्शना बंगला येथे यथोचित सत्कार केला व मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. सर्व युवकांसाठी प्रेरणादायी आहे आकाश तुला पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा!!! आकाश गोरे तुझ्या हातुन समाजाची सेवा घडो, हीच सदिच्छा..! या प्रसंगी उपस्थित अनिरुद्ध खोतकर, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष, पंडितदादा भुतेकर, शिवसेना संपर्कप्रमुख भाऊसाहेब घुगे, शिवसेना जिल्हाप्रमुख, प्रशांत वाडेकर, मेघराज चौधरी, दशरथ तोंडोळे, संतोष डोंगरखोस, संतोष रासवे, आदींची उपस्थिती होती.



## अलसुरे-शिरीषकरवाडी येथील समाज मंदिराचे मान्सूनपूर्व पावसात छत कोसळले

### सुमारे ७ लाखांचे नुकसान; नवीन समाज मंदिर इमारतीसाठी निधी मिळावा- दिनेश शिरीषकर

**दैनिक युवक आधार**
**योगेश सुतार**
**चिपळूण (प्रतिनिधी):-**



खेड तालुक्यातील अलसुरे-शिरिषकरवाडी येथील समाज मंदिराचे दिनांक ३० मे रोजी वादळी वाऱ्यासह झालेल्या मान्सूनपूर्व पावसात नुकसान झाले आहे. या समाज मंदिराच्या दुरुस्तीसाठी लवकरच निधी मिळावा अशी मागणी रोहिदास समाजसेवा संघ ता. खेड या सामाजिक संघटनेचे अध्यक्ष दिनेश शिरीषकर यांनी केले आहे. गेल्या काही वर्षांपूर्वी अलसुरे शिरीषकरवाडी येथे समाज कल्याण विभागाच्या निधीतून समाज मंदिर बांधण्यात आले. या समाज मंदिरात समाज उपयोगी उपक्रम राबवले जात असत. मात्र, गेल्या महिन्यात वादळी वाऱ्यासह झालेल्या मान्सूनपूर्व पावसात समाज मंदिराचे मोठे नुकसान झाले आहे. यामध्ये कौलांचे छत पूर्णतः कोसळले आहे. याची माहिती येथील ग्रामस्थांनी प्रशासनाला दिल्यानंतर महसूल विभागाने पंचनामा केला असून या समाज मंदिराचे सुमारे ६ ते ७ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. येत्या काही दिवसात या समाज मंदिराच्या दुरुस्ती अथवा नवीन समाज मंदिर बांधकामासाठी निधी मंजूर व्हावा, अशी मागणी अलसुरे शिरीषकरवाडी येथील ग्रामस्थांनी केली आहे.

## अनिरुद्ध खोतकर यांच्या हस्ते आयपीएस आकाश गोरे यांचे अभिनंदन

**दैनिक युवक आधार**
**मराठवाडा विभागीय संपादक**
**:प्राचार्य जगन्नाथ रासवे**
**जालना जिल्ह्यातील भाटेपुरी गावच्या**

आकाश पुंजाराम गोरे या सामान्य कुटुंबात जन्मलेल्या तरुणाने #UPSC पपरीक्षेतून #IPS या पदावर नियुक्ती झाल्याबद्दल दर्शना बंगला येथे यथोचित सत्कार केला व मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. सर्व युवकांसाठी प्रेरणादायी आहे आकाश तुला पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा!!! आकाश गोरे तुझ्या हातुन समाजाची सेवा घडो, हीच सदिच्छा..! या प्रसंगी उपस्थित अनिरुद्ध खोतकर, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष, पंडितदादा भुतेकर, शिवसेना संपर्कप्रमुख भाऊसाहेब घुगे, शिवसेना जिल्हाप्रमुख, प्रशांत वाडेकर, मेघराज चौधरी, दशरथ तोंडोळे, संतोष डोंगरखोस, संतोष रासवे, आदींची उपस्थिती होती.



## पलाडी गावाला सहा पदरी महामार्गावरून बोगदा , उड्डाण पूल , झेब्रा क्रॉसिंग रोड देण्यासाठी जिल्हाधिकारी यांना निवेदन


**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**
**भंडारा_वार्ताहर**

येथून जवळच असलेल्या पलाडी गावातून राष्ट्रीय सहा पदरी महामार्ग गेला आहे मात्र नवीन मार्ग निर्माण करतांना गावात प्रवेशासाठी सहा पदरी महामार्गावरून बोगदा , उड्डाण पूल , झेब्रा क्रॉसिंग रोड देण्यासाठी ग्रामपंचायत टेकेपार उसरागोंदी , यांच्या माध्यमातून निवेदन देण्यात आले ,
निवेदन देताना मार्शल प्रफुल रामटेके , लक्ष्मण टी. बारापात्रे , अश्विन गोस्वामी आणि गावातील नागरिक उपस्थित होते









ग्रामपंचायत कार्यालय टेकेपार/उसरा.
पंचायत समिती भंडारा,जि.प.भंडारा

# युवा ग्रामीण पत्रकार संघाचा वर्धापन दिन उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**- किशोर रमाकांत गुडेकर,**
**मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**

उत्कृष्ट पत्रकार आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार YGPS चॅनेलचे आमदार केराम यांच्या हस्ते लोकार्पण

**किनवट, ५ जून (प्रतिनिधी)** –
युवा ग्रामीण पत्रकार संघाचा प्रथम वर्धापन दिन गोपीकिशन मंगल कार्यालय, गोकुंदा येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन किनवट-माहूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा. भीमरावजी केराम यांच्या हस्ते झाले. त्यांनी आपल्या भाषणात सर्व पत्रकार बांधवांना शुभेच्छा दिल्या.
कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. गणेश कचकलवार




होते. यावेळी विजय सूर्यवंशी (विभागीय अध्यक्ष), परमेश्वर पेशवे (विभागीय संघटक), संभाजी सूर्यवंशी (जिल्हाध्यक्ष), आनंद शिनगारे (जिल्हा उपाध्यक्ष) आणि ज्येष्ठ पत्रकार दादाराव कयापाक यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. किनवटचे माजी उपनगराध्यक्ष श्रीनिवास नेमानिवार, युवासेना तालुका प्रमुख अजय कदम, उद्योजक नैतिक नाईक, सचिन वैद्य यांनीही आपली उपस्थिती आणि मार्गदर्शन दिले.
कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली.
त्यानंतर किनवट व माहूर तालुक्यातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सन्मानचिन्ह देऊन करण्यात आला. याच कार्यक्रमात आमदार केराम यांच्या हस्ते देशव्यापी YGPS चॅनेलचे लोकार्पण करण्यात आले. नांदेड जिल्ह्यातील उत्कृष्ट पत्रकारांचा सन्मान करण्यात आला. तसेच विविध शैक्षणिक संस्थांतील गुणवंत व यशस्वी पदाधिकारी यांचा देखील गौरव करण्यात आला.
कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन प्रा. विनोद कांबळे आणि सय्यद इसा यांनी केले.
याच दिवशी, संघटनेच्या देशभरातील शाखांमध्येही विविध सामाजिक उपक्रमांद्वारे वर्धापन दिन साजरा करण्यात आला.

## आष्टीत जरागे फोटो स्टुडिओ आणि एल.ई.डी स्क्रिनचा शुभारंभ

### मनोज जरागे पाटील,मा आ बाळासाहेब आजबे आदी मान्यवरांची उपस्थिती

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी :-**
**मारुती सत्रे**

वेडिंग,एल.ई.डी. फ्रेम,एल.ई.डी. स्क्रीन,प्रि-वेडिंग स्पार्कल फ्रेम, क्रेन कॅमेरा ३२ फुट,सिनेमॅटिक, ॲक्लिक फ्रेम,ड्रोन कॅमेरा,बेबी शुट,कप प्रिंटींग एच.डी. मिक्सर,न्यु बॉर्न बेबी शुट,पिलो प्रिंटींग फेसबुक लाईव्ह,मॉडेल शुट,टी-शर्ट प्रिंटींग यु-ट्युब लाईव्ह या सुविधा गावाच्या सांस्कृतिक आणि व्यावसायिक जीवनात नवीन अध्याय सुरू होत आहे! आष्टीतील नगर जामखेड रोडवरील ग्रामीण रुग्णालय फाट्यासमोर जरागे फोटो स्टुडिओ & एल.ई.डी स्क्रिनचा भव्य शुभारंभ बुधवार दि ४ जून रोजी सायंकाळी ६.३० वाजता अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. आष्टी तालुक्यातील प्रसिद्ध फोटोग्राफर कृष्णा जरांगे यांच्या फोटो स्टुडिओ अँड एलईडी स्क्रीन लाईव्ह उद्घाटन प्रसंगी मनोज दादा जरांगे पाटील, माजी आ बाळासाहेब आजबे, माजी जिल्हा परिषद सदस्य देविदास आबा धस ,डॉ शिवाजी राऊत, हभप नामधारक आसाराम महाराज, हभप आदिनाथ दानवे महाराज, किशोर हंबर्डे, डॉ चंद्रकांत ढेरे ,डॉ सोनवणे, डॉ टेकाडे डॉ जालिंदर वांढरे, महेश आजबे, राम खाडे ,संजय मेहेर, अमोल मेहर , नवनीत कटारिया, बाळू मेहेर, के के काळे, सतीश हराळ, पोपट आजबे, सरपंच सुधीर पठाडे, सुनील रेडेकर, मदन जगदाळे संदीप घोलप, अशोक पोकळे, संदीप साप्ते, सचिन रानडे, शिवा पोकळे, व सर्व फोटोग्राफर व मित्रपरिवार आदी मान्यवर, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आता आष्टीकरांसाठी कृष्णा जरागे यांनी हाय-टेक फोटो स्टुडिओ, वैयक्तिक, कौटुंबिक आणि व्यावसायिक फोटोशूटसाठी सज्ज झाले आहे तसेच मोठ्या आकाराची एल.ई.डी स्क्रिन,सार्वजनिक काथर्यक्रम, क्रीडा प्रसारण, सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यासाठी फायदा होणार आहे.हे अत्याधुनिक फोटोग्राफी सुविधा उपलब्ध झाली असल्याचे यावेळी बोलताना मान्यवरांनी सांगितले.




## हिंदी-मराठी पत्रकार संघाच्या बुलढाणा जिल्हाध्यक्षपदी श्रीकृष्ण तायडे

**दैनिक युवक आधार**
**संपादक संतोष आमले**

सामाजिक व धार्मिक कार्यात तसेच पत्रकार बांधवांच्या मदतीसाठी सदैव अग्रेसर दैनिक तभाचे प्रतिनिधी श्रीकृष्ण निनाजी तायडे यांची हिंदी-मराठी पत्रकार संघाच्या बुलढाणा जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. संघटनेचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष धनश्रीताई काटीकर पाटील यांनी नियुक्तीपत्र देऊन एका छोटेखानी समारंभात ही नियुक्ती केली. नवनिर्वाचित जिल्हाध्यक्षांच्या नियुक्तीने शहरासह ग्रामीण भागातील पत्रकारांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, श्रीकृष्ण तायडे यांचे सर्व स्तरावरून अभिनंदन होत आहे. हिंदी मराठी पत्रकार संघाच्या महाराष्ट्र प्रदेश मुख्य कार्यालयात पत्रकार संघाची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. तसेच मागील वर्षी दिलेल्या नियुक्ती संपुष्टात आल्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात नवीन नियुक्त्या करण्याचे एकमताने ठरले. याचाच एक भाग म्हणून बुलढाणा जिल्ह्याची जबाबदारी श्रीकृष्ण तायडे यांना सर्वानुमते देण्यात आली. पत्रकार हा आरशासारखा पारदर्शक असतो. त्याला घटनेच्या दोन्ही बाजू दिसत असतात आणि त्यावर तो आपल्या लेखणीच्या माध्यमातून न्याय देण्याचा पुरेपूर प्रयत्न करीत असतो. परंतु, पत्रकारिता करताना त्यांना येणाऱ्या अडचणी व समस्यांसाठी हिंदी-मराठी पत्रकार संघाच्या माध्यमातून नेहमी प्रयत्नशील राहण्याची ग्वाही यावेळी नवनियुक्त जिल्हाध्यक्ष श्रीकृष्ण तायडे यांनी दिली. मलकापूर तालुक्यात गेली वीस वर्षे पत्रकारिता करत असलेले श्रीकृष्ण तायडे यांनी विश्व हिंदू परिषद तसेच बजरंग दलाची विविध पदे भूषवली आहेत. सदर कार्यक्रमात अजय टप यांची विदर्भ संघटक पदावर, सतीश दांडगे यांची विदर्भ सचिव या पदावर, रवींद्र गणगे सर यांची जिल्हा सचिव पदावर, शेख निसार यांची



हिंदी विभाग जिल्हा उपाध्यक्ष पदावर, एन के हिवराळे यांची जिल्हा संघटक पदावर, विनायक तळेकर यांची जिल्हा सहसचिव पदावर, अशोक वानखेडे सर यांची शहर उपाध्यक्ष पदावर, प्रदीप इंगळे यांची तालुका सहसंघटक पदावर नियुक्ती करण्यात आली यावेळी , प्रा. प्रकाश थाठे सर, मयूर लड्डा, धर्मेश राजपूत, सुधाकर तायडे, डॉ. विजय भगत, सुनील देशमुख, रवी गवाळे, भाऊराव व्यवहारे, बिस्मिल्ला खा. पठाण ,आदी उपस्थित होते.

# आटो आणि दुचाकी चोरटा जेरबंद

### नवनियुक्त महिला ठाणेदार यांची धडक कारवाई

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी**
**:-जितेंद्र खोडे**



राळेगावः-तालुक्यातील फिर्यादी नामे शेख खलील शेख शब्बीर वय ४७ वर्ष रा. शिवाजी नगर राळेगाव यांनी दि.०४-०६-२०२५ ला रात्री ७:०० रोजी पोलिस स्टेशन राळेगाव येथे तक्रार दिली दरम्यान आटो क्रं. एम.एच २९ व्ही ९४०४ हा पशुवैद्यकीय दवाखाना राळेगाव येथे पार्कींग करून खर्रा खाने करीता गेला आणि परत आटो घेवून जाणे करीता आले असता त्याला त्याचा आटो वाहन मिळून आले नाही वाहन शोधले असता एक अज्ञात चोरटा आटो घेवून पळून जातांना फिर्यादी यांना दिसला अशा फिर्यादी यांनी दिलेल्या जबानी रिपोर्ट वरून अज्ञात आरोपी विरूध्द पोलिस स्टेशन राळेगाव अप क्र.०२३५/२०२५कलम ३०३(२) भा.न्या.सं. प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला.सदर गुन्ह्यातील आटो क्रं. एम.एच २९ व्ही ९४०४ व आरोपीचा परीसरामध्ये शोध घेत असतांना गोपनिय माहीती मिळाली की,सदर चोरटा हा आटो घेवून वर्धा रोडने पळाला आहे अशी माहीती मिळाली वर्धा रोडने कोसुर्ला गावा जवळ गुन्ह्यातील चोरीस गेलेले वाहन आटो क्र. एम. एच २९ व्ही ९४०४ आरोपी हा घेवुन जातांना दिसला त्यास थांबवण्याचा प्रयत्न केला असता आरोपी हा आटो रोडवर सोडून पळाला त्याचा पाठलाग करून त्यास ताब्यात घेतले त्याचे नाव ज्ञानेश्वर उर्फ नाना रमेश नेहारे वय २३ वर्ष रा. आपटी ता. राळेगाव जि. यवतमाळ असे सांगीतले सदर आरोपीस अटक करून आटो क्रं एम.एच २९ व्ही ९४०४ अंदाजे किंमत ९०,०००/- रूपये पंचासमक्ष जप्त करण्यात व आरोपी यास पोलिस स्टेशनला दाखल अप क्र. २३२/२०२५ कलम ३०३(२) भां.न्या.स मधील चोरीस गेलेली हिरो होन्डा पॅशन मोटर सायकल क्र. एम. एच २९ एस. ०७४१ बाबत विचारणा केली असता त्यांनी सदर मोटर सायकल हि दि.२२-०५-२०२५ रोजी त्रिमूर्ती मंगल कार्यालय राळेगाव येथून चोरी केली असल्याची कबुली दिली आरोपी कडुन अप क्र. २३२/२०२५ कलम ३०३(२) भां.न्या.स मधील चोरीस गेलेली क्र. १) हिरो होन्डा पॅशन मोटर सायकल क्र. एम. एच २९ एस.०७४१ अंदाजे किंमत ५०,०००/- रूपये व २) बजाज डिस्कव्हर मोटर सायकल क्र. एम.एच ३२ झेड ०९०५ अंदाजे किंमत ५०,०००/- रूपये असे दोन मोटर सायकल असा एकुण १,९०,०००/- रूपये चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून तपास सुरू आहे.सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक कुमार चिंता साहेब, अप्पर पोलीस अधीक्षक पियुश जगताप साहेब, उपविभागीय पोलीस अधीकारी पांढरकवडा श्री. रामेश्वर वेंजने साहेब यांचे मार्गदर्शाखाली पोलीस निरीक्षक शितल मालटे, पोलीस उपनिरिक्षक दिपक राणे पोलीस अंमलदार गोपाल वास्टर, सुरज चिव्हाणे, यांनी केली.

# "राजकारण्यांना सत्कार करण्याची इतकी घाई का.!"

आय. पी.एल. च्या स्पर्धेमध्ये रॉयल चॅलेंज बेंगळुरू संघाने सतत 18 वर्ष झुंज दिल्यानंतर, त्यांना विजेतेपद मिळाले. त्याचा आनंद सर्वांनाच झाला. मी सर्वानाच अशा अर्थाने म्हणतो की, आताच्या काळात, संघ कर्णधार विराट कोहली हा देशामध्ये सर्वांत लोकप्रिय खेळाडू आहे. त्याच्या चाहत्यांची लक्षणीय संख्या भारतासह जगभर आहे. म्हणुन त्याच्या संघाने जेतेपद मिळविले आणि देशभरात जल्लोष झाला. ते सहाजिक आहे. परंतु हा संघ कर्नाटक राज्याची राजधानी असलेल्या "बंगळुरु" नावाशी निगडित असल्यामुळे, त्या राज्यात इतर ठिकाणांपेक्षा जास्त जल्लोष झाला. मंगळवारी रात्री 11.30 वाजता हा सामना संपून कोहलीचा संघ विजेता म्हणुन घोषित झाला. तो विजयी सोहोळा साजरा करण्यासाठी, काही तासांच्या अवधीत कर्नाटक सरकारने बंगळुरू येथे चेन्नास्वामी स्टेडियममध्ये खेळाडूंचा जाहीर सत्कार समारंभ आयोजित केला. त्याला अलोट जनसमुदाय लोटणार. तिथे प्रचंड गर्दी होणार. हे कुणीही सांगू शकले असते. त्या गर्दीला काबूत ठेवणे. ही जिकिरीची गोष्ट होती. त्यासाठी आवश्यक त्या नियोजनासाठी अवधी मिळणे आवश्यक होते. परंतु घाईघाईने आयोजित केलेल्या कार्यक्रमाच्या गर्दीला आटोक्यात ठेवण्यासाठी, आवश्यक ते नियोजन करण्यासाठी वेळ न मिळाल्यामुळे नियोजनात त्रुटी राहिल्या. म्हणुन त्याचा व्हायचा तोच परिणाम झाला. तिथे अपेक्षेपेक्षा कितीतरी अधिक लोक जमा झाले. त्यामुळे प्रचंड रेटारेटी झाली. त्यात जीव गुदमरून 11 जणांचा बळी गेला. हा आकडा वाढू शकतो. तसेच 50 पेक्षा अधिक लोक मृत्यूशी झुंज देत औषधोपचार घेण्यासाठी हॉस्पिटल मध्ये दाखल झाले आहेत. हा झाला घटनाक्रम.
आता प्रश्न असा पडतो की,
संबंधित संघाचा कर्नाटक राज्य सरकारशी काय संबंध आहे? तो संघ खाजगी फ्रॅन्चायझीच्या मालकीचा आहे. हा समारंभ मालकांनी आयोजित करणे अपेक्षित होते. मग सिद्धरामय्या सरकारला इतकी घाई का झाली? इतक्या कमी वेळेत, नियोजनशुन्य समारंभ आयोजित करण्याची गरज होती का ? त्यांनी हा आटापिटा कशासाठी केला?
या अगोदर देशात अशाप्रकारचे सोहळे साजरे झाले नाहीत का? त्याची खूप उदाहरणे देता येतील. 1971 साली अजित वाडेकर ह्यांच्या नेतृत्वाखाली वेस्ट इंडिज संघाचा पराभव करून, परतलेल्या विजयी भारतीय संघाची मुंबई विमानतळापासून खूप लांब पल्ल्याची आणि प्रचंड गर्दीची मिरवणूक कोण विसरेल? त्यांचा सत्कार समारंभ ही तितकाच दिमाखदार झाला. तेव्हापासुन 2024 मध्ये रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली वर्ल्ड कप जिंकल्यानंतर मरीन ड्राईव्ह येथे निघालेली प्रचंड मिरवणूक,
सत्कार समारंभ अशा घटनांची पुष्कळ उदाहरणे देता येतील. परंतु आतापर्यंत कधीही आणि कुठेही
अशा प्रकारची मन सुन्न करणारी घटना घडली नाही. एक गोष्ट स्पष्ट आहे की, जिथे क्रिकेटर आणि क्रिकेट, तिथे



हमखास गर्दी. हे समीकरण माहीत असून देखील इतक्या घिसाडघाईने हा कार्यक्रम का आयोजित केला? ह्या आनंदाच्या क्षणात, आपल्या आवडत्या खेळाडू सह आनंद व्यक्त करण्यासाठी
प्रचंड गर्दीची खात्री असताना, त्या गर्दीचे योग्य नियोजन करण्यास पोलीस दलाला आवश्यक अवधी का दिला नाही? ह्या घटनेला जबाबदार कोण? त्याची नैतिक जबाबदारी आतापर्यंत कुणी का स्विकारली नाही? विशेष म्हणजे कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या ह्यांनी तर सांगून टाकले की, स्टेडियमची क्षमता 35, 000 इतकी असतांना, तिथे अडीच, तीन लाख लोक जमा झाल्यामुळे हा दुर्दैवी प्रकार घडला. म्हणजे बेसुमार गर्दी होणार हे त्यांना माहीत नव्हते का?
हा सत्कार समारंभ इतक्या घाईघाईने आणि नियोजनशून्य पद्धतीने आयोजित करण्यास एकच कारण आहे ते म्हणजे राजकारण्यांना संधीचा अचूक फायदा करून घेण्याची अतिशय घाई असते. "पळा, पळा, कोण पुढे पळे तो" ह्या उक्ती नुसार सर्वांत आधी सत्कार समारंभाचे आयोजन केल्याचे श्रेय घेण्यासाठी ही घाई केली गेली. त्याची शेखी पुढील काळात मिरवण्यासाठी हे बळी दिले असा माझा स्पष्ट आरोप आहे. कारण क्रिकेट हा खेळ आणि तो खेळणारे क्रिकेटपटू हे कायम भारतीयांच्या गळ्यातले ताईत
आहेत. भारतियांना क्रिकेटची फक्त आवड नसून, त्याचे वेड आहे. भले ही एखाद्या व्यक्तीला, त्या खेळातील ओ की ठो कळत नसेल, पण तो तन्मयतेने दूरदर्शनवर क्रिकेटचे सामने पाहतो. त्यात समरस होऊन आनंदी होतो. भारतीय संघ पराभूत झाल्यास, स्वतः पराभूत झाल्याचे दुःख होते. किंवा एखाद्याची ऐपत असेल तर सामन्याचे तिकीट काढून, प्रत्यक्ष सामना बघण्याचा आनंद घेतो. स्टेडियममध्ये असे अज्ञानी लोक खूप भेटतील. पण खेळ प्रत्यक्ष पाहण्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसतो. कर्नाटक सरकारने नेमके हेरले. त्याचे श्रेय घेण्यासाठी घिसाडघाईने हा कार्यक्रम आयोजित केला. ह्याबाबत पोलीस दलाला दोष देण्यात काहीच अर्थ नाही. कारण इतक्या मोठ्या समारंभाचे, योग्य नियोजन करण्यासाठी अवधी आवश्यक असतो. तो पोलीस प्रशासनाला मिळाला नाही. ह्याला जबाबदार फक्त कर्नाटक राज्य सरकार आहे. आता त्यांनी म्हणे चौकशी समिती नेमली आहे. माझे तर असे म्हणणे आहे की, आपल्या देशात आतापर्यंत किती चौकशा समित्या नेमल्या? त्याचे फलित काय निघाले? ह्या समित्यांची चौकशी करण्यासाठी, एक नवीन चौकशी समिती नेमून, त्यातून काय निष्पन्न झाले? ह्यांची चौकशी करून अहवाल सादर करण्याची मागणी करायला पाहिजे.असे म्हंटले तर तर तो विनोद होणार नाही.आजपर्यंत अगणित चौकशी समित्या नेमण्यात आल्या आहेत.
शेवटी काय! तर जाणाऱ्यांचा जीव गेला आणि जे जखमी होऊन उपचार घेताहेत, त्यांच्या नशिबात पुढे काय लिहून ठेवले आहे? हे आताच सांगणे कठीण आहे. किमान पुढच्या काळात तरी राजकारण्यांनी अशा कार्यक्रमाचे आयोजन करू नये. ते काम संघाच्या संबंधित पदाधिकाऱ्यांचे आहे किंवा आय. पी. एल. सारख्या फ्रॅन्चायझी सारख्या मालकांचे आहे. त्यांना संधी दिलीत, तर ते नियोजन पूर्वक कार्यक्रमाची आखणी करून, त्याची योग्य ती अंमलबजावणी करून, कार्यक्रमाला गालबोट न लागता,
यशस्वी करतील. त्यामुळे असे प्रसंग निश्चितपणे टाळता येतील. संबंधित क्रिकेट संघटनांस मी फार फार तर विनंती करू शकतो की, अशा कार्यक्रमांना राजकिय व्यक्तींना सन्मानाने उपस्थित राहण्यास विनंती करा.

**दैनिक युवक आधार**
**अरुण निकम.**
**9323249487.**

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (**RNI NO :- MAHMAR/2023/89514**) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# पहिल्यांदाच छत्रपती संभाजीनगरमध्ये! "अंबे" खाण्याची भन्नाट स्पर्धा!

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) -** आंब्याचा हंगाम म्हणजे चविष्ट अनुभव! आणि त्यात भर म्हणून, श्री. भिकन अंबे यांच्या वतीने राज्यस्तरीय आंबे खाण्याची स्पर्धा प्रथमच छत्रपती संभाजीनगरमध्ये आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धा रविवार, 8 जून 2025 रोजी सकाळी 9 वाजता गारखेडा स्टेडियम, छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे.

**विविध वयोगटांसाठी खुली स्पर्धा**

10, 15, 20, 30, 40 आणि 50 वयोगटातील मुलं-मुली, पुरुष व महिला सर्वांसाठी स्पर्धा खुली आहे. प्रत्येक वयोगटातील पहिल्या तीन विजेत्यांना रंगीत ट्रॉफी देऊन गौरविण्यात येईल. तसेच, "बेस्ट मँगो बॉय" आणि "मँगो गर्ल" या विशेष पुरस्कारांसाठी ट्रॅकसूट सन्मान देण्यात येणार आहे.

**प्रत्येक स्पर्धकाला मेडल व प्रमाणपत्र**

प्रत्येक सहभागी स्पर्धकाला सहभागाचे प्रमाणपत्र व मेडल देण्यात येणार असून, धमाल, मस्ती आणि अंब्याचा भन्नाट स्वाद यांचा संगम अनुभवता येणार आहे.

**महत्त्वाचे नियम व अटी**

आंबे आयोजकांनी उपलब्ध करून दिलेलेच खावेत.
आंबे कोय काढून, चोखून आणि स्वच्छपणे खाणे आवश्यक.
कोय घशात अडकल्यास स्वतःची जबाबदारी.
बाहेरगावाहून येणाऱ्यांसाठी जेवण व निवासाची व्यवस्था.
रजिस्ट्रेशनची अंतिम तारीखः 7 जून 2025, सकाळी 7 वाजेपर्यंत.
आवर्जून नोंदणी करा!
संपर्क कराः 9422203319 / 9168430000
स्पर्धा स्थळः गारखेडा स्टेडियम, छत्रपती संभाजीनगर
एक वेगळी, मजेशीर आणि चविष्ट स्पर्धा – मिस करू नका!
आंबा प्रेमींनो, या अनोख्या स्पर्धेचा आनंद घ्या आणि आपल्या आवडत्या आंब्यांना न्याय द्या!




# कळंबस्ते देवराई येथे तीन एकर जागेत वृक्षा रोपण सपन्न

## आ. शेखर निकम, जिल्हाधिकारी देवेंद्र सिंह यांच्या हस्ते शुभारंभ

**दैनिक युवक आधार**
**योगेश सुतार**
**चिपळूण प्रतिनिधी**

मौजे कळंबस्ते ता. चिपळूण येथील सुमारे 3 एकर शासकीय जागेमध्ये आज दि. 5 जून रोजी मानव निर्मित देवराई व घनवन तयार करणेचे कामाचा शुभारंभ जिल्हाधिकारी रत्नागिरी श्री. देवेंद्र सिंह यांचे मार्गदर्शनाखाली व आमदार श्री. शेखर निकम यांचे शुभहस्ते करण्यात आला. सदर कार्यक्रमाचे वेळी माजी जिल्हा परीषद अध्यक्ष श्री. रोहन बने, उपविभागीय अधिकारी चिपळूण श्री. आकाश लिगाडे, उपविभागीय कृषी अधिकारी चिपळूण श्री. शिवाजी शिंदे, तहसीलदार चिपळूण श्री. प्रविण लोकरे, तहसीलदार गुहागर श्री. परिक्षीत पाटील, तालुका कृषी अधिकारी श्री. शत्रुघ्न म्हेत्रे, मुख्याधिकारी नगर परिषद चिपळूण श्री. विशाल भोसले, सहयाद्री निसर्ग मित्रचे श्री. भाऊ काटदरे, नेरोलॅक कंपनीचे मॅनेजर श्री. सुर्वे, नाम फाऊंडेशनचे सदस्य तसेच इतर अधिकारी कर्मचारी व लोकप्रतिनिधी सदर कार्यक्रमास उपस्थित होते. सदर जागेमध्ये झाडांची लागवड करण्यासाठी महसूल विभाग कृषी विभाग यांचेकडील कार्यालयीन अधिकारी कर्मचारी, मंडळ



अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, कृषी सहायक व महसूल सेवक यांची एकूण 16 पथके तयार करणेत आलेली होती. प्रत्येक पथकात 8 अधिकारी कर्मचारी नियुक्त करणेत आले होते. सदरचे काम सकाळी 7 वाजता सुरु करण्यात येऊन सायंकाळी 5.30 वाजता संपवणेत आले. सुमारे 200 ते 225 अधिकारी कर्मचारी यांची चहा, नाश्ता व दुपारी जेवणाची व्यवस्था करणेत आली होती. सदर संपूर्ण कार्यक्रमाचे ड्रोन चित्रीकरण करजाई क्रिएशनचे श्री. महेंद्र कासेकर यांनी केले.

सदर जागेमध्ये एकूण 149 प्रजातीची 1252 फळझाडे, फुलझाडे, औषधी वनस्पती व इतर झाडे लावण्यात आली. सदरची झाडे पुणे, दापोली, खेड, संगमेश्वर, चिपळूण, गुहागर या ठिकाणच्या वेगवगळ्या नर्सरींमधून गोळा करण्यात आली. सदर देवराई व घनवन तयार करण्याचे 5 प्रमुख उध्दीष्ट आहेत. 1) जैवविविधता जतन करणे 2) पक्षी, मधमाशा, फुलपाखरु यांचे वसतीस्थान तयार करणे 3) क्युआर कोडच्या माध्यमातून बोटॅनिकल लॅब तयार करणे 4) सिडबँक तयार करणे 5) ग्रामपंचायत क्षेत्रात उदयानाची निर्मिती करणे हि प्रमुख उध्दिष्टे आहेत.

सदरची जागा कळंबस्ते रेल्वेफाटका शेजारी असून ती पूर्णपणे डोंगराळ व मोकळी होती. सदर जागा शासकीय असल्याचे अभिलेखावरुन दिसून आल्यानंतर सदर जागेची उपविभागीय अधिकारी चिपळूण श्री आकाश लिगाडे साहेब व तहसिलदार चिपळूण श्री लोकरे साहेब यांनी प्रत्यक्ष पाहणी करुन सदरची जागा शासनाच्या निर्देशानुसार मानवनिर्मित देवराई व घनवन तयार करणेसाठी सुयोग्य असल्याने या जागेची निवड करण्यात आली. व तसा अहवाल मा. जिल्हाधिकारी रत्नागिरी यांना सादर करण्यात आला. तदनंतर सदर जागेचे साटीकरणाचे काम नाम फाऊंडेशनचे माध्यमातून पूर्ण करण्यात आले. सपाटीकरणासाठी नाम फाऊंडेशनने त्यांचेकडील मशिनरी व इतर साहित्य उपलब्ध करुन दिलेनंतर जागेचे सपाटीकरण करण्यात आले. सदर ठिकाणी देवराई व घनवन तयार करणेसाठी वेगवेगळया कंपन्यांना उपविभागीय अधिकारी चिपळूण यांनी पत्र व्यवहार केलेनंतर सदर देवराई तयार करणेसाठी कानसई नेरोलेक पेंट कंपनीने पुढाकार घेऊन हे काम पूर्ण करणेसाठी आवश्यक सहकार्य केले. सदर जागेला कंपाऊंड व गेटची आवश्यकता असल्याने ते जेएसडब्ल्यु कंपनीने पूर्ण करुन दिले आहे. झाडांना पाण्याची आवश्यकता असल्याने सदर जागेत बोअरवेल पाडण्यात आली असून त्यामधून ठिबक सिंचनाव्दारे झाडांना पाण्याचा पुरवठा करण्यात आलेला आहे. त्यासाठी नविन विद्युत कनेक्शन घेण्यात आलेले आहे. झाडे लावताना आवश्यक खत कृषी विभाग व नगर परिषद चिपळूण यांनी उपलब्ध करुन दिले. सदर संपूर्ण देवराई व घनवनाचे संगोपन व देखभाल चिपळूण मधील नामवंत निसर्ग प्रेमी संस्था सहयाद्री निसर्ग मित्र यांचे मार्फत केले जाणार आहे. सदर देवराई व घनवन तयार करणेसाठी जिल्हाधिकारी रत्नागिरी श्री. देवेंदर सिंह यांचे प्रमुख मार्गदर्शनाखाली व चिपळूणचे उपविभागीय अधिकारी श्री. आकाश लिगाडे साहेब यांचे सुचनानूसार सर्व अधिकारी कर्मचारी यांनी उत्तम नियोजन करुन झाडांची सुयोग्य प्रकारे लागवड केल्यामुळे भविष्यात सदर ठिकाणी पर्यावरण प्रेमी व पर्यावरण अभ्यासक निश्चितपणे भेट देऊन समाधान व्यक्त करतील अशा शुभेच्छा आमदार निकम यांनी दिल्या.

# पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या वतीने करण्यात आल्या पोलीस पाटलांना महत्वाच्या सुचना

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, वार्ताहर**



पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पोलीस पाटलांच्या मासिक बैठकीमध्ये वपोनि गजानन घाडगे यांनी आगामी सण, उत्सव लक्षात घेवून महत्वाच्या सूचना केल्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने आगामी सण उत्सव जसे बकरी ईद, वटपोर्णिमा त्याचप्रमाणे नैसर्गिक आपत्ती अनुषंगाने आपत्कालीन संपर्क क्रमांक देण्यात आला. तसेच गावातील अडीअडचणीवर चर्चा करून योग्य ते मार्गदर्शन करण्यात आले. त्याप्रमाणे गावातील व परिसरातील संशयित वस्तू ,वाहने , इसम याची माहिती पोलिसांना देणे, अवैद्य धंद्यांची माहिती देणे, भाडेकरूंची माहिती देणे बाबत सोसायटी पदाधिकारी यांना माहिती देणे, त्याप्रमाणे डायल 112, सायबर क्राईम हेल्पलाइन नंबर - 1930, कोस्टल गार्ड हेल्पलाइन नंबर- 1093 आदींची माहिती यावेळी देण्यात आली. प्रामुख्याने वपोनि गजानन घाडगे यांनी आवश्यक त्या सूचना व उपस्थित 41 पोलीस पाटलांना मार्गदर्शन सुद्धा केले.

# मा.दीनानाथ मंगेशकर नाट्यगृहात कोकणातील प्रतिभावंत शाहिरांची जुगलबंदी

## श्री पाणबुडी देवी कलामंच ( मुंबई ) तर्फे आयोजन

## लोककलेच्या व्यासपीठावर ,नवी वैचारिक शिकवणींची पर्वणी

**दैनिक युवक आधार**
**मुंबई - ( केतन भोज )**

कोकणातील पारंपरिक लोककला होळी आणि गणेशोत्सव हे कोकणातील खरे खुरे उत्सव.या दोन्ही उत्सवासाठी येथील शेतकरी मोकळा असतो.भाताची लावणी संपली की घरोघरी गणपती येतात आणि भाताची कापणी /मळणी संपताच शिमग्याचे म्हणजेच होळीचे वेध लागतात.कोकणातील या दोन्ही सणांशी येथील लोककला निगडीत आहेत. शक्ती-तुरा (जाखडी ) हा सामूहिक नृत्याचा प्रकार आहे. गणेशोत्सवात गावतल्या प्रत्येक वाडीत जाखडीचा संच असतो. आठ गडी फेर धरून वादकांच्या भोवती नाचतात.ढोलकी आणि घुंगरू ही पारंपरिक वाद्य आणि आधुनिक ढंगाची गाणी यांचा मेळ जाखडीत असतो.जाखडीत आता अनेक बदल झालेत.वेशभूषा,प्रकाश योजना,संगीत आणि वाद्यवृंद यांनी सध्याची जाखडी वेगवान आणि रंगीतसंगीत बनली आहे.आता जाखडीचा जंगी सामना जणू प्रेक्षकांसाठी पर्वणी असते. कोकणातील लोककला हीच जतन करण्यासाठी आणि रसिक मनोरंजनासाठी रायगड - रत्नागिरी असा दिग्गज शाहिरांचा जंगी मुकाबला होणार आहे.यामध्ये शक्तीवाले शाहीर प्रभाकर धोपट यांच्याविरुद्ध तुरेवाले शाहिर ज्ञानदीप भोईनकर शक्ती-तुरा रसिकांचे मनोरंजन करणार आहेत. रसिक हो आपली उपस्थिती अनमोल असून हा सामना मंगळवार दि.१५ जुलै २०२५,रोजी रात्रौ ८.३० वा.मा. दीनानाथ मंगेशकर नाट्यगृह,विले पार्ले,पूर्व ( मुंबई ) येथे होणार आहे. या सामन्याचे आयोजन श्री पाणबुडी देवी कलामंच ( मुंबई ) यांनी केले असून अधिक माहितीसाठी किंवा तिकीटसाठी ९९३०५८५१५३ / ९८३३६८९६४२ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.




# शांततेत, प्रेमभावनेत व सामूहिक सौहार्दाने बकरी ईद साजरी करा – शेख अब्दुल रहीम यांचे आवाहन

**दैनिक युवक आधार**
**छत्रपती संभाजीनगर**

दिनांक 7 जून 2025 रोजी मुस्लिम समाजाचा महत्वाचा सण बकरी ईद जिल्हाभरात साजरा केला जाणार आहे. यानिमित्ताने विविध गावांमध्ये नमाज पठण व कुर्बानीचे कार्यक्रम होणार असून, शांतता व सौहार्द कायम राखण्यासाठी पोलीस प्रशासन सज्ज झाले आहे. प्रत्येक गावात शांतता समिती व मोहल्ला कमिट्यांच्या बैठका घेण्यात येत असून, नागरिकांना शांततेत व संयमाने सण साजरा करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलिसांकडून पेट्रोलिंग, फिक्स पॉइंट, तसेच पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला आहे. सोशल मिडिया प्लॅटफॉर्मवर पोलीस प्रशासन बारकाईने लक्ष ठेवून आहे. चुकीच्या, उकसवणाऱ्या किंवा अफवा पसरवणाऱ्या पोस्ट शेअर करण्याचे टाळावे, असे आवाहन करण्यात आले आहे. मुस्लिम बांधवांनी सार्वजनिक ठिकाणी कुर्बानी टाळावी, तसेच महानगरपालिका व स्थानिक प्रशासनाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे. कोणताही धार्मिक कार्यक्रम आयोजित करताना स्थानिक पोलीस ठाण्याशी समन्वय साधावा आणि अनुचित प्रकार घडल्यास तत्काळ पोलिसांना माहिती द्यावी. "बकरी ईद हा सण सौहार्दपूर्ण वातावरणात, प्रेमभावनेत आणि एकमेकांच्या सहकार्याने साजरा व्हावा," असे आवाहन हॅप्पी टू हेल्प फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शेख अब्दुल रहीम यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे जिल्ह्यातील व राज्यातील सर्व नागरिकांना केले आहे.



# लिहाखेडी येथे स्व.कडूबा पा.साखळे ग्रंथालयात 'शिवराज्याभिषेक दिन''उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोडः-** तालुक्यातील लिहाखेडी येथील स्व.कडुबा पा.साखळे ग्रंथालयात दि.६ शुक्रवार रोजी "शिवराज्याभिषेक दिन "उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी गावकरी मोठ्या संख्येने हजर होते. यावेळी प्रतिमेस पुजन करण्यात आले.यावेळी स.अध्यक्ष प्रा.शिवराम साखळे,नामदेवराव साखळे,चेअरमन अशोक साखळे,बाळाराम साखळे,श्री.विष्णु फरकाडे,विनोद चव्हाण,आत्माराम फरकाडे,हरिदास साखळे,कृष्णा साखळे,कृष्णा बावस्कर,संभाजी डापके,व्यंकट डापके,सुनिल साखळे,प्रभाकर बावस्कर,देविदास सपकाळ,भिमराव सपकाळ,विलास बावस्कर,शंकर सरोदे,प्रकाश साखळे,विशाल फरकाडे, सुनिल बावस्कर, ग्रंथपाल ललीता साखळे, चंद्रभान साखळे,विशाल साखळे आदीची उपस्थिती होती .



# पालोद येथे स्वप्नपूर्ती महिला प्रभाग संघ वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड** :- तालुक्यातील पालोद येथे स्वप्नपूर्ती महिला प्रभागसंघ वार्षिक सर्वसाधारण सभा दि. 05/06/ 2025 रोजी उत्साहात पार पडली. सर्वप्रथम राष्ट्रमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाची दीप प्रज्वलन प्रभाग संघ पदाधिकारी अध्यक्ष सारिका समिंद्रे, सचिव सरला बनसोडे कोषाध्यक्ष कमल लोखंडे , पालोदचे सरपंच नसीम बेगम नासेर पठाण, उपसरपंच मच्छिंद्र पालोदकर, माननीय रत्नाकर पगार गटविकास अधिकारी वर्ग 1, जिल्हा व्यवस्थापक बिभीषण भोईटे सर तालुका अभियान व्यवस्थापक संदीप कापसे , तालुका व्यवस्थापक नवनाथ पवार , ग्रामविकास अधिकारी जयदीप



सुरुशे व इतर मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. मा.अशोक शिरसे , प्रकल्प संचालक , जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा छत्रपती संभाजीनगर यांच्या आदेशानुसार व मा.रत्नाकर पगार , गट विकास अधिकारी वर्ग १ पंचायत समिती सिल्लोड यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका अभियान व्यवस्थापक संदीप कापसे , तालुका व्यवस्थापक नवनाथ पवार तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष पंचायत समिती सिल्लोड यांच्यामार्गदर्शन नुसार करण्यात आले. मा. पगार सर गट विकास अधिकारी वर्ग एक यांनी प्रभागात महिलांनी वैयक्तिक व्यवसाय व सामूहिक व्यवसाय जास्तीत जास्त करावे व शाश्वत उपजीविका वर मार्गदर्शन केले. त्याचबरोबर DM. भोईटे यांनी आदर्श प्रभाग संघ या विषयी माहिती दिली .मा तालुका व्यवस्थापक नवनाथ पवार यांनी अभियानविषयी माहिती दिली, कार्यक्रमाचे प्रस्ताविक संदिप बोके यांनी केले. प्रभाग संघाची लिपिका यांनी प्रभाग संघाच्या मागील वर्षाचा लेखाजोखा सभेमध्ये मांडला. त्यानंतर आलेल्या मान्यवरांनी सविस्तर मार्गदर्शन केले. श्री संदीप कापसे तालुका अभियान व्यवस्थापक यांनी उपजीविका विषयी महिलांना सविस्तर माहिती दिली. नासेर पठाण यांनी प्रभाग संघासाठी प्रशस्त असे कार्यालय दिले. त्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त केले. अंजना सोन्ने यांनी ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था बाबत माहिती दिली , बँक व्यवस्थापक व पत्रकार बांधव यांनी देखील सभेमध्ये उपस्थितांना मार्गदर्शन केले, तसेच या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ICRP मैनाबाई ठाले व छाया आगे यांनी केले.कार्यक्रमाला यशस्वी होण्यासाठी रवींद्र सहाणे, राजेंद्र भोपळे , नसीम शेख, सागर कुसुंबे, काशिनाथ पंडित प्रभाग समन्वयक,पशु व्यवस्थापक अमोल मिरगे, सागर पांढरे , यश पालोदकर, सचिन बडक कृषी व्यवस्थापक अविनाश बनसोडे, राजू सपकाळ ग्रामरोजगार सेवक, योगेश पालोदकर संगणक परिचालक, सतीश दांडगे, जुनेद पठाण, कयूम शेख व सर्व समुदाय संसाधन व्यक्ती,कृषी सखी, पशु सखी यांनी मेहनत घेतली तसेच पालोद गावातील सर्व ICRP आणि कृषी सखी यांनी विशेष प्रयत्न केले तसेच कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सलमा शेख यांनी केले. तसेच मा.रत्नाकर पगार साहेब गटविकास अधिकारी वर्ग 1 यांनी उत्कृष्ट काम करणाऱ्या सीआरपी

रंजना जमधडे, सलमान शेख, राजू, छाया आगे, मैना ठाले,पूजा आगे, अश्विनी सपकाळ ,अनिता गायकवाड, राजकन्या साखळे, सुनिता सपकाळ, सुमन बनसोडे, प्रभावती काकडे, स्वाती जवखेडे यांचा सत्कार केला.

तसेच पालोद प्रभागातील सर्व समुदाय संसाधन व्यक्ती उपजीविका सखी व ग्राम संघातील पदाधिकारी उपस्थित होते.

# सुप्रिया गायकवाड : शिक्षण, चिकाटी आणि नवकल्पनांचा संगम"

आसाराम विरकर,
दैनिक युवक आधार,
छत्रपती संभाजीनगर

एका सामान्य कुटुंबातून आलेल्या सुप्रिया गायकवाड यांनी ज्या प्रकारे आपल्या शिक्षणाचा, मेहनतीचा आणि सकारात्मक दृष्टिकोनाचा संगम साधून यशस्वी वाटचाल केली, ती खरंच प्रत्येकाला नवा आत्मविश्वास देणारी आहे. शेती हा आपला पारंपरिक व्यवसाय असला तरी, सुप्रिया यांनी या क्षेत्रात नुसतेच पाय रोवले नाहीत, तर नव्या कल्पनांचा वापर करून एक अनोखा व्यवसाय उभा केला. B.SC. ॲग्रीकल्चर नंतर, त्यांनी ॲग्री आणि फूड बिझनेस मॅनेजमेंटमध्ये पदव्युत्तर शिक्षण घेतलं. शिक्षणानंतर त्या थांबल्या नाहीत – त्यांनी स्पिरुलिनासारख्या अद्भुत शेवाळावर लक्ष केंद्रित करून, त्याला 'सुपरफूड' म्हणून बाजारात ओळख मिळवून दिली. २०१६ मध्ये फक्त दोन टँकपासून सुरू झालेला त्यांचा प्रवास आज NUTRIGIEN AGROTECH PVT. LTD. या यशस्वी




कंपनीपर्यंत पोहोचला आहे. कंपनीचं वार्षिक उत्पन्न आज ८० लाख रुपयांपेक्षा जास्त आहे. पण हे यश एका रात्रीत मिळालं नाही. शंकांचा सामना करावा लागला, अपयशही पदरी पडलं, पण सुप्रिया गायकवाड यांची चिकाटी आणि आत्मविश्वास या सगळ्यांवर मात करत राहिला.

सुप्रिया यांचं यश हे दाखवून देतं की, शेती केवळ पारंपरिक पद्धतींवरच चालत नाही, तर ती आधुनिक तंत्रज्ञान, प्रयोगशीलता आणि धाडसी दृष्टिकोनाच्या साहाय्याने आणखी फुलवता येते. त्यांनी स्पिरुलिनापासून टॅबलेट्स, पावडर, हेल्थ सप्लिमेंट्स तयार केले, जे डॉक्टर, फिटनेस ट्रेनर्स आणि डायटिशियन्सकडूनही पसंत केले जात आहेत. आज सुप्रिया गायकवाड केवळ एक यशस्वी उद्योजिका नाहीत, तर मार्गदर्शकही आहेत. शेकडो तरुण, विशेषतः महिला, त्यांच्या मार्गदर्शनाखाली नव्या कल्पनांना बळ देत आहेत. सुप्रिया यांचा संदेश स्पष्ट आहे – "शेती जुनाट नाही, ती स्मार्ट बनवता येते. फक्त तुमच्यात सकारात्मक दृष्टिकोन आणि नवनवीन प्रयोगांची तयारी हवी." त्यांच्या यशाचा खरा गाभा त्यांच्या जमिनीवरच्या नात्यात आहे – त्या आजही स्वतः फार्मवर जातात, प्रत्येक बॅचची गुणवत्ता तपासतात, आणि प्रत्येक नव्या प्रकल्पात स्वतःला पूर्णपणे गुंतवतात. यामुळेच त्यांचं यश इतरांपेक्षा वेगळं आणि अधिक प्रेरणादायी ठरतं. सुप्रिया गायकवाड यांची कहाणी शिकवते की, यशाच्या मागे केवळ संधी नव्हे, तर चिकाटी, मेहनत आणि योग्य निर्णय क्षमता असावी लागते. त्यांच्या यशाने आज शेतीला एक नवा चेहरा दिला आहे – एक असा चेहरा ज्यामध्ये महिलांचा आत्मविश्वास, शिक्षणाचा प्रकाश आणि नवनवीन प्रयोगशीलता झळकते.

**मराठी उद्योजकांना उद्देशून एक संदेश :**

"आजच्या स्पर्धात्मक काळात टिकून राहायचं असेल, तर शिक्षण, प्रयोगशीलता आणि चिकाटी ही त्रिसूत्री कायम लक्षात ठेवा. नव्या कल्पनांना स्वीकारा, अडचणींना धैर्याने सामोरे जा, आणि आपल्या व्यवसायाला एका वेगळ्या उंचीवर न्या. कारण यश नेहमीच त्यांच्या पाठीशी असतं, जे खरोखरच अपार मेहनत आणि आत्मविश्वास घेऊन पुढे जातात!"

# जागतिक पर्यावरण दिन- गटविकास अधिकारी पंचायत समिती सिल्लोड रत्नाकर पगार यांच्या हस्ते विविध ठिकाणी वृक्षारोपण

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधीः- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** 5 जून 2025 गुरूवार रोजी जागतीक पर्यावरण दिवसाचे औचित्य साधून पंचायत समिती सिल्लोड कार्यालय, मोढा खुर्द, पालोद येथे गटविकास अधिकारी पंचायत समिती सिल्लोड रत्नाकर पगार यांच्या हस्ते वृक्षारोपण करून परिसर स्वच्छता करण्यात आला. तसेच गटविकास अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सिल्लोड तालुक्यातील सर्व ग्रामपंचायती मध्ये परीसर स्वच्छता व वृक्षारोपण करण्यात आले. तसेच जागतिक पर्यावरण दिन 2025 ची थीम जागतिक स्तरावर प्लास्टिक प्रदुषणाचा अंत आहे.पर्यावरण, वन व हवामान बदल अधोरेखित करण्या करीता 22 मे 2025 ते 05 जून 2025 या कालावधीत मोहीम राबविण्यात येत आहे.छत्रपती संभाजीनगर हरीत संकल्प लोकसहभागातुन समृध्द निसर्ग या वृक्षारोपण लागवड मोहीम स्वरूपात राबविण्यात आली.यावेळी सर्व विभाग प्रमुख, अधिकारी,कर्मचारी,लोकप्रतिनिधी यांनी वृक्षारोपण केले पर्यारण प्रतिज्ञा घेण्यात आली यावेळी विस्तार अधिकारी पंचायत अण्णासाहेब गाडेकर, केवलसिंग पाटील, स्वच्छ भारत मिशन ग्रामीण गटसमन्वयक केशवकांत बुलबुले,सरपंच लक्ष्मण कल्याणकर, नासेर बेग पठाण,मच्छिंद्र पालोदकर,ग्रामपंचायत अधिकारी विलास हुमणे,जयदिप सुरसे व सर्व विभाग प्रमुख, अधिकारी ,कर्मचारी व मोठ्या संखेने ग्रामस्थ उपस्थित होते.



## विवाहिता बेपत्ता

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**



राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता एक विवाहिता कुठेतरी निघून गेल्याने ती हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. आरती अनिल राठोड (22 रा.गणेशवाडी, पळस्पे) असे नाव असून उंची 4 फुट 5 इंच, बांधा सडपातळ, रंग गोरा, चेहरा गोल, केस काळे वाढलेले असून अंगात ब्ल्यू रंगाचा पंजाबी ड्रेस परिधान केलेला आहे. सोबत रेडमी कंपनीचा मोबाईल फोन आहे. तिला बंजारा, हिंदी, कन्नड भाषा अवगत आहे. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा सहा. पो.उपनि.हानुमंत आहिरे यांच्याशी संपर्क साधावा.

## भारतातील सर्वात पुरातन देव वृक्ष असलेल्या आळंदी येथील सुवर्ण पिंपळाचे बीज निर्मिती करून निल्लोड वारकरी शिक्षण संस्थेत रोपण

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**
**सिल्लोड**




आळंदी येथील संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या समाधी मंदिराच्या उजव्या बाजूला दैवी असा सुवर्ण पिंपळ नावाचा देववृक्ष आहे ,तो भारत भूमीवरील 2500 वर्ष वयाहुन अधिक व सर्वात प्राचीन वृक्ष असून सदर वृक्ष धनाची देवता कुबेराने लावला आहे असा संदर्भ स्कंद पुराणात आहे अशी माहिती श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी ,आळंदी देवाची यांनी उपलब्ध करून दिली आहे. संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या आई माता रुख्मिनी यांनी या वृक्षास सव्वा लक्ष प्रदक्षिणा घातल्या आहेत. या देववृक्षाच्या फळांचे बीज संकलन करून सिल्लोड येथील अभिनव प्रतिष्ठानचे पर्यावरण संवर्धक डॉ.संतोष पाटील यांनी रोपे बनवून निल्लोड फाटा येथील श्री माऊली वारकरी शिक्षण संस्थेच्या प्रांगणात पर्यावरण सप्ताहाच्या निमित्ताने हभप रामेश्वर महाराज पवार, शिक्षक कृष्णा जैवळ ई. हस्ते 2 ठिकाणी रोपण करण्यात आले. ----

पिंपळाची पर्यावरनातील "स्वर्नीम" भूमिका* -पिंपळाची फळे खाणारे पक्षी--हळद्या,तांबट,हरोळी,किरपोपट,राखी धनेश, लालबुड्या व शिपाई बुलबुल आदी 22 प्रकारचे पक्षी. घरटी करणारे - काळी शराटी,रात बगळा, गाय कावळा,डोमकावळा, आयबीस ई अधिवास यावर असतो.- डॉ. संतोष पाटील, सिल्लोड

# केनडियरने आणले लहान मुलांसाठी खास दागिने

## प्रत्येक दागिन्यांमध्ये पारंपरिक चिन्हे व आधुनिक कारीगरी यांचा मिलाप आहे

दैनिक युवक आधार
मुंबई, प्रतिनिधी



आभूषण मौल्यवान असतात, सांस्कृतिक महत्त्व, आनंद साजरा करण्यासाठी, आनंदाच्या क्षणांची कायमस्वरूपी आठवण म्हणून देखील दागिन्यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. दागिन्यांचे हे कालातीत महत्त्व कुटुंबातील सर्वात छोट्या सदस्यांसाठी देखील खूप जास्त असते. म्हणूनच, केनडियर बाय कल्याण ज्वेलर्स प्रस्तुत करत आहेत मुलांसाठी खास तयार केलेल्या फाईन ज्वेलरीचे, विचारपूर्वक निवडण्यात आलेले कलेक्शन. प्रत्येक दागिन्यांमध्ये पारंपरिक चिन्हे व आधुनिक कारीगरी यांचा मिलाप आहे. हे दागिने दिसायला सुंदर आहेत, त्यासोबतच दर दिवशी वापरण्यासाठी आरामदायी व सुरक्षित देखील आहेत. एखाद्या खास प्रसंगाची, दिवसाची आठवण म्हणून असो, किंवा आपल्या लहानग्यांना दागिन्यांनी सजवण्याचा आनंद असो, या कलेक्शनमध्ये अनेक शानदार पर्याय आहेत जे भावभावना आणि स्टाईल दोन्ही दर्शवतात. भालचंद्र ब्रेसलेट पारंपरिक सुवर्ण नजरिया आहे, जो लहान मुलांसाठी खास तयार करण्यात आला आहे. स्लीक डिझाईन आणि पावित्र्याचे प्रतीक म्हणून लोकप्रिय असलेले हे ब्रेसलेट सुरक्षा आणि सांस्कृतिक सौंदर्य दोन्ही प्रदान करते. मुलींसाठी अतिशय पसंत केले जाणारे हे बेस्टसेलर दर दिवशी परिधान करण्यासाठी खूप छान आहे. भेट म्हणून देण्यासाठी किंवा दर दिवशी वापरण्यासाठी हे ब्रेसलेट परफेक्ट आहे.

किड्स कलेक्शनमधील या सुंदर कडा ब्रेसलेटमध्ये मुलांचे खूप आवडते स्ट्रॉबेरी डिझाईन आहे. सोन्यापासून बनलेले, गुळगुळीत, कास्टिंग फिनिशचे हे कडा ब्रेसलेट चिमुकल्या हातांचे सौंदर्य आणि आनंद द्विगुणित करते. एखाद्या खास दिवसाचा आनंद साजरा करणे असो किंवा दर दिवसाची चमक वाढवणे असो, मौजमस्ती आणि परंपरा यांचा आकर्षक मिलाप यामध्ये मिळतो. चिमुकल्या ट्रेन्डसेटर्ससाठी ही गोड भेट खूपच छान आहे. कप केक किड्स गोल्ड इयररिंग्सचे हे डिझाईन सुंदर आणि आकर्षक आहे. याचे व्हायब्रन्ट इनेमल फिनिश, आकर्षक रंग मुलांसाठी परफेक्ट आहे. वजनाला हलके आणि आरामदायी इयररिंग्स वाढदिवस, भेट किंवा दर दिवसाची मौजमस्ती यासाठी खूप छान आहेत. लहानग्या परीच्या ज्वेलरी कलेक्शनमध्ये हे इयररिंग्स असायलाच हवेत. रेड कार किड्स गोल्ड पेंडेंट केनडियरच्या किड्स कलेक्शनमधील अतिशय स्टायलिश दागिना आहे, जो मौजमस्तीला प्रोत्साहन देतो. व्हायब्रन्ट इनेमल डिटेलिंगसह लाल कारचे हे मजेशीर डिझाईन अतिशय खास आहे. आपल्या लहानग्यांसाठी लूकमध्ये पर्सनालिटीचा स्पर्श देण्यासाठी हे खूप छान आहे. वजनाला हलके, बहुउपयोगी असे हे पेंडंट दर दिवशी वापरण्यासाठी किंवा खास प्रसंगांसाठी सुयोग्य आहे. एक आकर्षक पर्याय जो मुलांच्या दागिन्यांमध्ये आनंद आणि कल्पनाविस्तार यांचा मिलाप घडवतो. केनडियरच्या किड्स कलेक्शनमध्ये डॉल्फिन किड्स डायमंड इयररिंग्ससोबत क्युटनेस देखील मिळतो. खेळकर डॉल्फिन मोटिफ्स आणि सोन्याची चमक यांच्यासह हे इयररिंग्स छोट्या जनावरांवर प्रेम करणाऱ्या मुलांसाठी खूप छान आहेत. वजनाला हलके आणि मजेशीर इयररिंग्स शाळेसाठीच्या लूकसाठी, सणासुदीच्या कपड्यांसोबत प्रत्येक पेहरावासोबत साजेसे ठरतील. ही भेट पाहताक्षणी पसंत पडेल आणि हे इयररिंग्स तुमच्या लहानग्या परीचे सर्वात आवडते बनतील हे नक्की.

## जागतिक पर्यावरण दिना निमित्य नवनियुक्त महिला ठाणेदार शितल मालते यांच्या हस्ते वृक्षारोपण

### पर्यावरण संवर्धन व विकास समिती राळेगाव यांचा वृक्षारोपण करण्यात समावेश

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधीः-**
**जितेंद्र खोडे**

**राळेगावः-** पर्यावरण दिनाचे औचित्य साधुन आज दिनांक ०५-०६-२०२५ ला पोलीस स्टेशन राळेगाव येथे नव्यानेच रुजू झालेल्या महिला ठाणेदार शितल मालते यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले,पर्यावरण दिनी, एक वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित केला. या कार्यक्रमात पोलीस स्टेशनचे अधिकारी पोलीस उपनिरीक्षक दिपक राणे,पोलीस अंमलदार गोपाल वास्टर,सुरज चिव्हाणे आणि कर्मचारी, तसेच स्थानिक नागरिक उपस्थित होते. या कार्यक्रमात विविध प्रकारची झाडे लावण्यात आली. पर्यावरण समिती जिल्हाध्यक्ष विनोद दौंदल यांनी संवाद साधून वृक्षारोपणाने परिसरातील हवा शुद्ध होण्यास मदत होईल, तसेच परिसराची सुंदरता वाढण्यास मदत होईल निसर्गाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपण ही काळाची गरज आहे.पर्यावरणाची काळजी घेणे आणि वृक्षारोपण करणे ही अत्यंत आवश्यक बाब आहे. झाडे पर्यावरणासाठी अत्यंत महत्त्वाची आहेत. त्यातून आपल्याला शुद्ध हवा मिळते, तसेच ते पाण्याचे प्रमाण वाढवतात आणि जमिनीची धूप देखील कमी करतात. त्यामुळे, पर्यावरण रक्षणासाठी वृक्षारोपण करणे अत्यंत आवश्यक आहे, यावेळी पर्यावरण समिती जिल्हाध्यक्ष विनोद दौंदल,तसेच पर्यावरण समिती सदस्य अड.दिपक जुमनाके,पर्यावरन समिती सदस्य कैलास कोडापे(पत्रकार),जितेंद्र खोडे(पत्रकार),कविता धुर्वे (पत्रकार) इत्यादी पर्यावरण संवर्धन व विकास समिती सदस्य हजर होते.



## रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया व्यापारी आघाडी पुणे जिल्हा उपाध्यक्षपदी रमेश थोरात यांची निवड

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी डॉक्टर देवेंद्र ओव्हाळ**

पुणे जिल्हा उपाध्यक्ष पदी *आयु तुळशीराम (रमेश)थोरात* यांची नियुक्त करण्यात आली हि नियुक्ती महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष मा. पोपट शेठ घनवट तसेच महाराष्ट्र प्रदेश सचिव मा.सचिन वाघमारे साहेब याच्या आदेशानुसार तसेच मा.वैजनाथ मुगांवकर पाटील, महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष मा.अविनाश दुधावडे पुणे जिल्हा अध्यक्ष, मा.माणिक पौळ पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष,मा.बाबासाहेब हजारे पुणे जिल्हा कार्याध्यक्ष, मा.अमोल चांदणे खेड ता.अध्यक्ष, मा.बसवराज हिंगमिरे पुणे जिल्हा सल्लागार इतर व्यापारी आघाडी पदाधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार नियुक्ती देण्यात आली हे.नियुक्तीपत्र मा.सचिन वाघमारे साहेब, मा.अविनाश दुधावडे, वसवराज हिंगमिरे याच्या हस्ते देण्यात आले तसेच अविनाश दुधावडे यानी थोरात यांना पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या



# ग्रामसेवकाकडून माहिती लपवण्याचा प्रयत्न; कुरुळ ग्रामपंचायतीत भ्रष्टाचाराचा आरोप, ग्रामस्थांचा ठिय्या आंदोलनाने घेतला पेट

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

अलिबाग तालुक्यातील कुरुळ ग्रामपंचायतीतील प्रशासनाच्या कारभारावर गंभीर संशय निर्माण झाला आहे. गेल्या दोन वर्षांपासून प्रशासकाच्या अखत्यारीत चाललेल्या या ग्रामपंचायतीत हजारोंच्या नव्हे तर लाखोंच्या भ्रष्टाचाराचा आरोप थेट ग्रामस्थांनी केला आहे. विशेष म्हणजे, या आरोपांची माहिती मागवूनही ग्रामसेवकांकडून ती देण्यास सातत्याने टाळाटाळ केली जात असल्याने ग्रामस्थ आक्रमक झाले असून बुधवारी त्यांनी थेट ग्रामपंचायत कार्यालयावर ठिय्या आंदोलन छेडले.कुरुळ ग्रामपंचायत ही तालुक्यातील एक प्रतिष्ठीत ग्रामपंचायत असून येथे गेल्या दोन वर्षांपासून प्रशासक कार्यरत आहे. या प्रशासकीय काळात निधीच्या गैरवापराचे प्रकार उघडकीस येत असून, ग्रामस्थांनी त्यावर प्रश्न उपस्थित केले आहेत. 2 मे रोजी झालेल्या तहकूब ग्रामसभेमध्ये सादर केलेल्या जमाखर्च पत्रकात अनेक तफावती निदर्शनास आल्या आहेत. विशेष म्हणजे गावातील एक रस्ता स्थानिक नागरिकाने स्वतःच्या खर्चाने बांधलेला असताना त्या रस्त्यावर ग्रामनिधीतून २ लाख ६७ हजार रुपयांचा खर्च दाखवण्यात आला, ही बाब उघड होताच ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला.ग्रामस्थांनी ग्रामसेवकाकडे कामाचे दस्तऐवज मागितले असता, "ते काम आमच्या काळात झालेले नाही" असे सांगून पळ काढण्यात आला. इतकेच नव्हे तर, "ग्रामसभेत रेकॉर्ड दाखवण्याची तरतूद नाही, तुम्ही दुसऱ्या दिवशी कार्यालयात या," असे आश्वासन दिल्यानंतर ग्रामस्थ कार्यालयात पोहोचले, मात्र ग्रामसेवक गायब! "पंचायत समितीत काम आहे" अशा सबबी देत त्यांनी कार्यालयात हजेरी लावलीच नाही.या सर्व प्रकारामुळे ग्रामसेवक मुद्दाम माहिती लपवून भ्रष्टाचार झाकण्याचा प्रयत्न करत असल्याचा गंभीर आरोप अड. मनोज ओव्हाळ यांनी केला. ते म्हणाले, "ही थेट ग्रामनिधीची चोरी आहे. चौदावा व पंधरावा वित्त आयोगातून आलेल्या निधीचा विनियोग कुठे आणि कसा झाला, याचा पत्ता नाही. काम झाले नसताना पैसे दिले जात आहेत. हा ग्रामस्थांच्या हक्काच्या निधीचा अपहार आहे. प्रशासन जबाबदार आहे." या आंदोलनात अनेक ग्रामस्थांनी सहभाग घेतला होता. यामध्ये रोशन चंद्रकांत भगत, माजी सरपंच अड. मनोज ओव्हाळ, माजी सदस्य अवधूत पाटील, उत्तम पाटील, सचिन पाटील, निलेश पाटील, सागर पाटील, गणेश पाटील, विनोद म्हात्रे, सुहास पाटील, नीलेश राणे यांची उपस्थिती होती. सरकार व प्रशासनाने या गंभीर प्रकरणाची तत्काळ चौकशी करून दोषींवर फौजदारी कारवाई करावी, अशी ग्रामस्थांची ठाम मागणी आहे. अन्यथा ग्रामपंचायत भ्रष्टाचाराच्या दलदलीत अडकून जनतेचा पैसा उधळला जाणार, असा इशारा या आंदोलनातून देण्यात आला आहे.



## सामाजिक कार्यकर्ते केतन भोज यांच्या तक्रारी नंतर अखेर सहाय्यक अभियंता सूर्यकांत सातपुते यांची बदली

**दैनिक युवक आधार**
**घाटकोपर,(प्रतिनिधी);**

महापालिकेच्या एन विभाग कार्यालयातील घन कचरा व्यवस्थापन विभागातील सहाय्यक अभियंता सूर्यकांत सातपुते यांचा तीन वर्षाचा कालावधी संपला होता.तरी देखील ते खुर्ची सोडायला तयार नव्हते,कायद्यानुसार ३ वर्षाचा कालावधी संपला तरी सदर अधिकाऱ्यांच्या बदल्या प्रशासन का करित नाही.असा संतप्त सवाल माहिती अधिकार कार्यकर्ते केतन भोज यांनी संबंधित प्रशासनाला केला होता.महापालिकेच्या एन विभाग कार्यालयातील घन कचरा व्यवस्थापन विभागातील सहाय्यक अभियंता म्हणून सूर्यकांत सातपुते २०१७ पासून रुजू झाले होते.तरी यांचा कार्यकाळ पूर्ण झाल्यावर वरिष्ठांचा व प्रशासनाचा अंकुश न राहिल्यामुळे अशा अधिकाऱ्याची अरेरावी आणि दांडगाई वाढलेली होती.त्यांच्या मनमानी कारभारामुळे नागरिक प्रचंड त्रस्त झाले होते.सलग ३ वर्षाचा कार्यकाळ पूर्ण केलेला असताना मनपा प्रशासन यांना येवढी मोठी मुदतवाढ एखाद्या अधिकाऱ्याला कशी काय देऊ शकते?आणि जर मुदतवाढ द्यायची नसेल तर त्यांच्या जागी नव्या अधिकाऱ्यांची तरी नियुक्ती करायला हवी. घन कचरा व्यवस्थापन,एन विभागातील सहाय्यक अभियंता सूर्यकांत सातपुते यांची बदली का होत नाही?असा प्रश्न भोज यांनी प्रशासनाला विचारला होता.यांसारखे अधिकारी वर्षानुवर्षे एकाच ठिकाणी ठाण मांडून बसले आहेत.तरी अशा अधिकाऱ्यांच्या कार्यकाळची व कामकाजाची चौकशी करून लवकरात लवकर बदली करावी.अशी मागणी केतन भोज यांनी राज्याचे मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री,नगर विकास विभागाचे प्रधान सचिव,महापालिका मुख्य आयुक्त तथा प्रशासक, राज्याचे मुख्य सचिव,उपलोक आयुक्त तसेच सहाय्यक आयुक्त एन विभाग यांच्याकडे केली होती. अखेर त्यांच्या तक्रारीची प्रशासनाने दखल घेतली असून, सुर्यकांत सातपुते - सहाय्यक अभियंता(घ.क.व्य.)एन विभाग यांना दि.०२.०६.२०२५ रोजी एन विभाग कार्यालयातून प्रमुख अभियंता (घ.क.व्य.)यांच्या क्र. प्र.अभि./१८३९ दि.३०.०५.२०२५ आदेशान्वये कार्यमुक्त बदली करून कार्यकारी अभियंता (परिवहन) शहर विभागात पाठविण्यात आले आहे.तसेच आता मनपा एन विभाग सहाय्यक अभियंता(घ.क.व्य.) या ठिकाणी किरण सिंग पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

## नांदगाव पोलिसांची दमदार कारवाई :

### १६.३९ लाखांचा गुटखा जप्त, विंचूरच्या तस्करांना अटक

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी**
**राजेश भडांगे**

विंचूर :- महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला विमल पानमसाला व तंबाखूची मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्या दोघांना नांदगाव पोलिसांनी रंगेहात पकडले. तब्बल ₹१६,३९,००० किमतीचा गुटखा व बोलेरो पिकअप वाहन जप्त करण्यात आले असून विंचूर येथील दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे.



पोलिस निरीक्षक प्रितम चौधरी यांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. पो.कॉ.दत्तात्रय सोनवणे, पो.उ.नि एस.के. बहाकर, पो.कॉ.रविंद्र पवार, सिद्धार्थ वाघ व सागर बोरसे यांचे पथक पंचासमवेत ६ जून रोजी पहाटे ०१.०५ वाजता साकोरा रस्त्यावर सापळा रचून पिकअप गाडी (क्रमांक MH 19 BM 0823) ताब्यात घेतली. गाडीची तपासणी केली असता, त्यामध्ये प्रतिबंधित विमल केसरयुक्त पानमसाला आणि व्ही-१ विंग तंबाखूच्या गोण्या आढळून आल्या. आरोपींनी सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे दिली, मात्र पंचासमक्ष झडतीदरम्यान व्ही-१ विंग तंबाखू (₹२२ प्रति पुडा) १,१०० पुडे ₹२४,२००, व्ही-१ विंग तंबाखू (₹३० प्रति पुडा) २,१०० पुडे ₹६३,०००, विमल पानमसाला (₹१९८ प्रति पुडा) १,१०० पुडे ₹२,१७,८००, विमल पानमसाला (₹४७० प्रति पुडा) २,२०० पुडे ₹१०,३४,०००, बोलेरो पिकअप वाहन अंदाजे ₹३,००,००० असा एकूण किंमत: ₹१६,३९,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पो.कॉ. दत्तात्रय बाळकृष्ण सोनवणे यांचे फिर्यादीवरून महेश रमेश आहेर (वय ३२), रा. पांडुरंग नगर, विंचूर, निलेश दिलीपचंद बोथरा (वय ४२), रा. पोथनिस पार्क, विंचूर या

दोघांविरुद्ध भा.दं.वि. कलम १२३, २२३, २७४, २७५ आणि अन्न सुरक्षा कायदा २००६ मधील कलम ३(५) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर मुद्देमाल साक्षीदार व पंचासमक्ष नमुने घेत सील करण्यात आले असून पुढील तपास नांदगाव पोलीस करीत आहेत.

# सर्वात मोठ्या दिवाळी अंक स्पर्धेचा निकाल जाहीर

## राज्यस्तरीय स्पर्धेत ‘हंस’, तर जिल्हास्तरीयमध्ये ‘इंद्रधनु’ ठरले सर्वोत्कृष्ट

**दैनिक युवक आधार**
**पनवेल(प्रतिनिधी)**

विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मुंबई मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या २४ व्या राज्यस्तरीय व रायगड जिल्हास्तरीय सर्वात मोठ्या दिवाळी अंक स्पर्धेचा निकाल जाहीर झाला आहे.

एक लाख रुपये व सन्मानचिन्ह असलेला सर्वोत्कृष्ट राज्यस्तरीय दिवाळी अंकाचा पुरस्कार ‘हंस’ अंकासाठी देण्यात येणार आहे, तर रायगड जिल्ह्यास्तरीय प्रथम पारितोषिक इंद्रधनु अंकाने पटकाविला असून चाळीस हजार रुपये आणि सन्मानचिन्हाने त्यांना गौरविण्यात येणार आहे.




दिवाळी अंक महाराष्ट्राची पूर्वापार चालत आलेली एक सांस्कतिक परंपरा आहे. ही परंपरा अखंडपणे चालू राहावी व त्यातून दर्जेदार दिवाळी अंकांची निर्मिती व्हावी यासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेले श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ तसेच मुंबई मराठी पत्रकार संघ यांच्या वतीने गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्रातील सर्वांत मोठ्या दिवाळी अंक स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. या वेळची ही २४ वी स्पर्धा आहे. राज्यभरातून उदंड प्रतिसाद लाभलेल्या या स्पर्धेसाठी ज्येष्ठ साहित्यिक प्रा. अविनाश कोल्हे, महाराष्ट्र सेवा संघ मुलुंडचे कार्यवाह अरूण भंडारे आणि सुप्रसिद्ध सुलेखनकार सुनील धोपावकर यांनी परीक्षक म्हणून जबाबदारी बजावली. स्पर्धेचे मुख्य समन्वयक म्हणून मुंबई मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष शैलेंद्र शिर्के यांनी, तर रायगड जिल्ह्यातील स्पर्धेचे समन्वयक म्हणून संघाचे ज्येष्ठ सदस्य दीपक म्हात्रे यांनी काम पाहिले. स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा लवकरच मान्यवरांच्या उपस्थितीत होईल, असे पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण यांनी कळविले आहे.

**राज्यस्तरीय निकाल**

सर्वोत्कृष्ट दिवाळी अंक-हंस, द्वितीय पारितोषिक-अंतरीचे प्रतिबिंब, तृतीय पारितोषिक-अक्षर, सर्वोत्कृष्ट विशेषांक-नवभारत, दृश्य कला विशेषांक; मुलांसाठी सर्वोत्कृष्ट दिवाळी अंक-वयम, उत्तेजनार्थ-छावा, उत्कृष्ट दिवाळी अंक-कालनिर्णय, सर्वोत्कृष्ट कथा-सत्याग्रह, मिलिंद बोकील (दीपावली), उत्कृष्ट कविता-आजकाल बायकाही..., लक्ष्मी यादव, पुरुष स्पंदन (७६); लक्षवेधी परिसंवाद-असहमतीचा आवाज, ऋतूरंग; लक्षवेधी मुलाखत-डॉ. सुनील लवटे, शब्दशिवार, इंदूमती गोंधळे; सर्वोत्कृष्ट मुखपृष्ठ-**उत्तम अनुवाद,**

सर्वोत्कृष्ट व्यंगचित्रकार-प्रभाकर वाईरकर, शब्द रूची; सर्वोत्कृष्ट डिजिटल अंक-विवेक मेहेत्रे, 'उद्वेली-ऑल दि बेस्ट 2024'; विशेष लेख-राजकारण की टोळीयुद्ध, आर्याबाग, विनय हर्डीकर.

**रायगड जिल्हास्तरीय निकाल**

सर्वोत्कृष्ट दिवाळी अंक-इंद्रधनु, द्वितीय पारितोषिक-आगरी दर्पण, तृतीय पारितोषिक-शब्दसंवाद, उत्तेजनार्थ-लोकसेवक, साहित्य आभा, उत्कृष्ट कथा-रेखा नाबर, लोकसेवक, जिथे कमी तिथे मी; उत्कृष्ट कविता-हितवर्धक, कवी गणपत म्हात्रे, उत्कृष्ट व्यंगचित्रकार-विवेक मेहेत्रे, साहित्य आभा.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करून मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

## विष्णुनगर ग्रामपंचायत कार्यालय येथे शिवराज्याभिषेक सोहळा दिन साजरा

दैनिक युवक आधार
निफाड तालुका प्रतिनिधी
राजेश भडांगे




**विंचूर:-** विष्णुनगर ता. निफाड येथील ग्रामपंचायत कार्यालय शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त ध्वज फडकला रयतेचा राजा शिवछत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासातील सुवर्णक्षण म्हणजेच शिवराज्याभिषेक सोहळा रायगडाच्या सिंहासनावर 6 जून 1674 रोजी पार पडला हाच प्रेरणादायी दिवस दरवर्षी शिवराज्याभिषेक दिन म्हणून साजरा केला जातो या पावन दिवशी आज विष्णुनगर ग्रामपंचायत कार्यालय येथेही कार्यक्रम संपन्न झाले यावेळी तंटामुक्ती अध्यक्ष ज्ञानेश्वर देसले यांच्या हस्ते ध्वज फडकवण्यात आला त्यांनतर नवनाथ जेऊघाले यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले त्यानंतर प्रसाद वाटप करण्यात आला यावेळी ज्ञानेश्वर देसले,हेमंत घायाळ,विलास जेऊघाले,मच्छिंद्र गावडे, ज्ञानेश्वर घायाळ,सुधाकर थोरात व अमोल घायाळ यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते

# शिवरायांच्या पावन भूमीत रायगड अजूनही 'पालक' विना बेवारस!"

दैनिक युवक आधार
महाराष्ट्र प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराजांचा गड, स्वराज्याचे सिंहासन, मराठी मनाचा आत्मसन्मान!

आणि हेच पावन भूमीचे नाव आज 'पालकमंत्री नसलेला जिल्हा' म्हणून सरकारी फाईलांत फिरतंय, हे ऐकून संतापाने मस्तक तापल्याशिवाय राहात नाही! एकहाती सत्ता तरीही रायगडचं काय? राज्यात महायुतीचे एकहाती सरकार! मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, एकनाथ शिंदे – तिघेही सत्तेच्या शिखरावर. पण रायगडचा पालकमंत्री ठरवायला या त्रिकुटाला वर्ष झालं, तरी वेळ मिळालेला नाही. सत्तेतील वाटप, खुर्च्यांची जुळवाजुळव, राजकीय तोडगे हे सगळं चाललंय, पण रायगड मात्र अजूनही फाईलधारकांच्या गोंधळात अडकलेला. राष्ट्रवादीच्या आदिती तटकरे यांचं नाव पालकमंत्रिपदासाठी अंतिम झाल्याचं खुद्द मंत्रालयात सांगितलं जात होतं. पण रायगडमधील शिवसेनेचे तीन आमदार यांना तटकरे यांचं नाव खटकतंय.ते म्हणतात, "पालकमंत्री आमचाच हवाय!" पण हेच आमदार जेव्हा महाविकास आघाडी सरकारमधून तटकरे यांच्या विरोधात डरकाळ्या फोडत तेव्हा बाहेर पडले, आजच्या




महायुतीत बसून गप्प का बसलेत? आता का विरोध करत नाही? सत्तेच्या लाळेत ओली झालेली जिव्हा आता थंड झाली आहे का? 'स्वाभिमान' नावाचा शब्द विसरलात का? तुम्ही जर खरोखरच स्वाभिमानी असाल, तर आज तटकरे यांचं नाव सरकारनं पुढे केल्यावर सत्तेतून बाहेर पडा, जसा आधी पडलात! पण सध्याची परिस्थिती अशी आहे, ना घराचे राहिले, ना तटाचे! आणि आवाजही नाही, फक्त सावध लूक मुख्यमंत्री फडणवीस, तुमचं स्पष्ट धोरण काय? फडणवीस साहेब, आता तुम्ही मुख्यमंत्री आहात. मग रायगडसारखा ऐतिहासिक जिल्हा एक वर्ष 'पालक' विना का ठेवला जातोय? तुमचं राष्ट्रवादीशी पटतंय म्हणून तटकरे यांना ग्रीन सिग्नल द्यायचा आणि शिवसेना कुरकुरत राहिली तरी दुर्लक्ष करायचं ही भूमिका काय दर्शवते? ६ जूनचा राजाभिषेक आणि रायगड विना पालक? येत्या ६ जून रोजी रायगड किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा पार पडणार आहे. तोवर तरी पालकमंत्री मिळणार की नाही, हा प्रश्न रायगडवासीयांना त्रास देतोय. शिवरायांच्या गडाला जर योग्य पालक मिळत नसेल, तर महायुती सरकारने सत्तेत राहण्याचा नैतिक हक्क गमावला आहे!

## खासदार. संजय देशमुख यांनी वर्षभरात मतदार संघातील 58. प्रश्न संसदेत मांडले.!!

दैनिक युवक आधार
उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम
गजानन पवार पाटील.

वाशिम.- यवतमाळ वाशिम लोकसभा मतदारसंघाचे खासदार संजय देशमुख यांनी संसदेत गेल्या वर्षभरात तब्बल 58. प्रश्न उपस्थित करत मतदारसंघातील समस्या आणि विकास कामाकडे केंद्र शासनाचे लक्ष वेधले च्या लोकसभा निवडणुकीच्या निकालाला 4 जून 2025. रोजी एक वर्ष पूर्ण झाले. या वर्षभरात खासदार संजय देशमुख यांनी 95 टक्के संसद उपस्थिती राखत 15 वेळा विविध विषयावर संसदेत भाषण केले. वाशिम जिल्ह्यातील वाशिम व कारंजा हे विधानसभा मतदारसंघ यवतमाळ वाशिम लोकसभा मतदारसंघात असून रिसोड हा अकोला लोकसभा मतदारसंघात मोडतो. जिल्ह्यातील एमआयडीसी क्षेत्रात मूलभूत सुविधा आणि मोठ्या उद्योगधंद्याचा अभाव आहे तसेच शेतमालावर आधारित प्रक्रिया उद्योग आणि उच्च शिक्षणाच्या सुविधा अपुऱ्या आहेत. मतदारांनी 2024 मध्ये भाकरी फिरवत उद्धव ठाकरे गटाचे उमेदवार संजय देशमुख यांना विजयी करून लोकसभेत पाठवले. त्यांनी शकुंतला रेल्वेचा प्रश्न तसेच वाशिम मार्गे मुंबई रेल्वे सुरू करण्याची मागणी रेल्वे मंत्राकडे मांडली. वाशिम मध्ये शासकीय महाविद्यालय सुरू करण्याची मागणी गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित होती. यावरही त्यांनी संसदेत लक्ष घालून पाठपुरावा केला असून गतवर्षीपासून वाशिम मध्ये वैद्यकीय महाविद्यालय कार्यान्वित झाले आहे.



मतदारसंघात आणि संसदेतही सक्रिय. खासदार संजय देशमुख यांची वर्षभरातील संसदेतील उपस्थिती लक्ष्मी राहिली. 2024 च्या हिवाळी सेशनला त्यांची 85% टक्के तर 18.व्या लोकसभेच्या पहिल्या सेशनला ते 100% उपस्थित राहिले.18.व्यां लोकसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात त्यांची 100% टक्के उपस्थिती राहिली. तर 2025. च्या बजेट सेशनला 88% त्यांची टक्के उपस्थिती होती. खासदार. संजय देशमुख.

## जेसीबी चालक तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या.बोराळा येथील घटना. मृतक - (गिव्हा) गणेशपुर येथील रहिवासी.

दैनिक युवक आधार
उप जिल्हा प्रतिनिधी वाशिम
गजानन पवार पाटील.



वाशिम जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील असलेल्या गणेशपुर (गिव्हा ) येथील शेतकरी महिलेच्या जेसीबी चालक पुत्राने कर्जबाजारीपणाला कंटाळून मोहाच्या झाडाला गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना बुधवार 4 जून रोजी दुपारी बोराळा शेत शिवारात घडली असून प्रदीप सुखदेव ठाकरे. 32.वर्ष वय. असे मृतकाचे नाव आहे. मिळालेल्या प्राप्त माहितीनुसार प्रदीप ठाकरे हा मालेगाव तालुक्यातील गणेशपुर गव्हा येथील रहिवाशी असून त्यांच्याकडे त्यांची आई सौ. सुमनबाई ठाकरे यांच्या नावाने थोडीफार शेती आहे. प्रदीप हा विवाहित असून त्याला दोन व तीन वर्षाच्या लहान लहान दोन मुली आहेत. प्रदीप हा जेसीबी ऑपरेटर (चालक) होता. त्याने एका खाजगी फायनान्स कंपनीकडून कर्ज घेऊन ट्रॅक्टर सुद्धा घेतला असल्याची माहिती मिळाली आहे. प्रदीप ठाकरे हा 4 जून रोजी एरंडा येथील आपल्या मालकाची पोकलेन मशीन घेऊन बोराळा येथील शेतकरी दिनकर नामदेव वानखेडे यांच्या गट क्रमांक 146. मधील शेतातील विहिरीमधील गाळ काढण्याकरिता गेला होता. विहिरी मधून गाळ काढण्याचे काम सुरू असताना प्रदीप ठाकरे यांनी त्याच शेतातील 30 फूट उंच असलेल्या मोहाच्या झाडाला जमिनीपासून पंधरा फूट अंतरावर दोरीच्या सहाय्याने दुपारी 4.00. वाजता दरम्यान गळफास लावून आत्महत्या केली. प्रदीप ठाकरे हा गेल्या काही दिवसापासून आर्थिक विवंचनेत होता. त्याला खाजगी कंपनीकडून घेतलेल्या कर्जाची चिंता सतावत होती अशी माहिती त्याच्या एका मित्राने दिली. या घटनेची माहिती मिळताच जऊळका पोलीस स्टेशन चे ठाणेदार हिवरकर यांनी पोलीस कर्मचाऱ्यांचा घटनास्थळ गाठून घटनेचा पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणी साठी हलविला. जऊळका पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून प्रकरण तपासात घेतले आहे. शवविच्छेदन अहवाल प्राप्त झाल्यानंतरच मृत्यू कशामुळे झाला हे स्पष्ट होणार आहे.

सदर घटनेची माहिती मिळताच जऊळका पोलीस स्टेशनचे ठाणेदार हिवरकर. साहेब व कर्मचाऱ्यासह घटनास्थळ गाठून तात्काळ दखल घेतली.

## चांदवड तालुक्यातील अत्यंत दुर्दैवी घटना परिसरात चांदवड तालुक्यात पहिल्यांदाच बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू

दैनिक युवक आधार
निफाड तालुका प्रतिनिधी
राजेश भडांगे



रायपूर :- भडाणे ता.चांदवड येथील राहत असणारे
रामदास सिताराम आहेर
वय 45 गट नंबर 83 लागत भडाणे रायपूर शिव रस्ता रात्री साडेनऊच्या दरम्यान मजुरी करून घरी परत येत असताना बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू

सचिन भाऊसाहेब आहेर हे रस्त्याने गाडीवरती जात असताना त्यांना अचानक रक्त दिसलो व झाडांमध्ये आवाज आला त्यांनी गाडीचा प्रकाश चमकावला असता त्यांना बिबट्या दिसला त्यांनी आवाज देऊन परिसरातील नागरिकांना बोलावले तर त्या ठिकाणी रामदास आहेर हे निदर्शनात आले व रघुनाथ सुखदेव वाघ यांनी ही माहिती कोणी पशु प्राणी मित्र भागवत झालटे यांना दिली व त्यांनी तत्काळ वन विभागाला बोलवून पुढील प्रक्रिया सुरू केली रात्री पंचनामेसाठी शासकीय रुग्णालय चांदवड येथे नेण्यात आले वन विभागाची पुढील पंचनामा तपास चालू आहे अशी सविस्तर माहिती भागवत झाल्टे वन्यप्राणी पशु मित्र यांनी दिली त्यांच्या पश्चात तीन मुली व एक मुलगा आहे वडील मोठे बंधू असा त्यांचा परिवार आहे चांदवड तालुक्यातील रायपूर भडाणे शिवरात बिबट्याच्या हल्ल्यात एक जण ठार काल रात्री साडेनऊच्या सुमारास बिबट्याच्या हल्ल्यात रायपूर भडाने येथील शेतकऱ्याचा मृत्यू झाला होता आज सकाळी वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी या शेत शिवारात येऊन पाहणी केली असता या ठिकाणी बिबट्याचा वावर आहे असे सांगितले व या ठिकाणी दोन पिंजरे लावण्यात आले आता लावण्यात आला आहे वन्य पशु प्राणी मित्र भागवत झाल्टे यांनी तहसीलदार मंदार कुलकर्णी साहेब यांच्याशी फोनवरून संवाद साधला असता त्यांनीही शासनाकडून जी मदत होईल आम्ही प्रयत्न करू असे तहसीलदार मंदार कुलकर्णी यांनी सांगितले आहे त्यावेळेस वन्य पशु प्राणी मित्र भागवत झाल्टे यांनी असे सांगितले की परिसरातील नागरिकांनी सतर्क करावे शाळेतील मुलांना जातानी काळजी घ्यावी शेतात जाताना रात्रीच्या वेळेस बॅटरीचा वापर करावी परिसरात वन विभागाने दस्त घालावे अशी झाल्टे यांनी माहिती दिली

## शिवसेना शाखा क्रमांक ६६ (उ.बा.ठा)तर्फे लता गोपीनाथ शिंदे( वय-७६ वर्ष )या आजीला सहारा

दैनिक युवक आधार
मुंबई (शांताराम गुडेकर)

शिवसेना शाखा क्रमांक ६६ (उ.बा.ठा) विभागात राहणाऱ्या लता गोपीनाथ शिंदे( वय-७६ वर्ष )या आजी रस्त्यावर राहात होत्या. त्यांच्याकडे झोपायला सुद्धा जागा उपलब्ध नव्हती.त्यांचा सांभाळ करायला किंवा काळजी घ्यायला कोणीच नाही अशी माहिती शिवसेना शाखा क्र. ६६च्या उप महिला संघटिका श्रद्धा वाल्मिकी व गटप्रमुख धर्मराज यांना मिळाली.त्यानंतर लता ताईंची व्यथा शाखेवर येऊन सांगितले.त्यांची अडचण लक्षात घेऊन मीनाली पाटील(शाखा संघटिका) यांनी लता गोपीनाथ शिंदे( वय-७६ वर्ष )यांना विरार येथील मराठा फॉउंडेशन विरार पूर्व या आश्रमात घेऊन जाण्याचा व तेथे त्यांची राहण्याची व जेवणाची सोय करून सहारा दिला.या विभागाचे विधानसभा संघटक श्री.संजय मानाजी कदम,व उपविभागप्रमुख प्रसाद आयरे, उदय महाले (शाखाप्रमुख ) यांच्या मार्गदर्शनाने व शिवसेनेच्या पक्षाच्या आशीर्वादाने हे काम पार पडले असे मत यानिमित्ताने बोलताना मीनाली पाटील(शाखा संघटिका)यांनी व्यक्त केले.








महाशक्ती अम्बुलन्स असोसिएशनचे महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष शरद कात्रजकर साहेब यांची पनवेल महाशक्ती अम्बुलन्स असोसिएशन च्या सभासदांची भेट. त्या भेटी दरम्यान महाशक्ती अम्बुलन्स असोसिएशन रायगड जिल्हा कार्याध्यक्ष मुकुंद कांबळे प्रकाश जाधव अण्णासाहेब पाटील योगेश कुलकर्णी इमरान भाई मुन्नाभाई यांची भेट घेतली. त्या भेटी दरम्यान पनवेलच्या सभासदांनी आपल्या होणाऱ्या अडचणी आणि व्यथा अध्यक्ष शरद कात्रजकर साहेबांसमोर मांडल्या. व त्या अडचणीवर मात कशी करायची याची रीतसर संकल्पना शरद कात्रज कर साहेबांनी पनवेलच्या सभासद सांगितलं.
( छायाचित्र दैनिक युवक आधार सह संपादक मुकुंद कांबळे )

## वीर वाजेकर महाविद्यालयातर्फे पर्यावरण दिनानिमित्त विविध ठिकाणी वृक्षारोपण संपन्न.

दैनिक युवक आधार
तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी




उरण तालुक्यातील रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, महालण विभाग, फुंडे यांच्या राष्ट्रीय सेवा योजना (NSS) आणि राष्ट्रीय छात्र सेनेच्या (NCC) वतीने उरण तालुक्यात विविध ठिकाणी जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने वृक्षारोपण करण्यात आले. "प्लास्टिक प्रदूषणाचा अंत करा" (BEAT PLASTIC POLLUTION) या २०२५ च्या जागतिक पर्यावरण दिनाच्या घोषवाक्याला अनुसरून, पर्यावरण रक्षण आणि प्लास्टिकविरहित जीवनशैलीसाठी जनजागृती करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत दिघोडे येथील महात्मा गांधी विद्यालय, बापूजी देव मंदिर परिसर, खारपाटील महाविद्यालय चिरनेर आणि रयत शिक्षण संस्थेचे कर्मवीर भाऊराव पाटील हायस्कूल पिरकोन या ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले. वृक्षारोपणासोबतच चिरनेर येथील बापूजी देव देवराई परिसरात स्वच्छता मोहिमाही राबविण्यात आली. या कार्यक्रमास वीर वाजेकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर, उपप्राचार्य गजानन चव्हाण, राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख प्रा. राम गोसावी, राष्ट्रीय छात्र सेनेचे विभाग प्रमुख डॉ. राजकुमार कांबळे, यांच्यासह राष्ट्रीय छात्र सेनेचे विद्यार्थी व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक आणि स्वयंसेविका उपस्थित होते. महात्मा गांधी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री फल्ले सर, चिरनेर येथील खारपाटील हायस्कूलचे प्राचार्य पट्टेबहादूर सर, पिरकोन येथील शाळा व्यवस्थापन समितीचे प्रमुख श्री जीवन गावंड, महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी निकेतन रमेश ठाकूर तसेच फ्रेंड्स ऑफ नेचर (FON) चिरनेर संस्थेचे श्री दिनेश चिरनेरकर हेही विविध ठिकाणी संपन्न झालेल्या वृक्षारोपण कार्यक्रमात सहभागी झाले होते. महाविद्यालयाच्या वतीने चिंच, कडुलिंब, आवळा, पिंपळ आणि करंज अशी विविध प्रकारची सुमारे 100 झाडे लावण्यात आली.

## "तळेखार ते रेवदंडा रस्त्यावर ठेकेदारांचा भस्मासूर ? N.O.C. घेतलीच नाही का? नागरिक संतप्त!"

दैनिक युवक आधार
निलेश फुंडे रेवदंडा





तळेखार ते रेवदंडा दरम्यान सुरू असलेले डांबरीकरणाचे काम अपूर्ण, निष्काळजी, आणि नागरिकांच्या सुरक्षेचा विचार न करता धोकादायक पद्धतीने सुरू असल्याने स्थानिकांमध्ये संतापाचा आगडोंब उसळला आहे. विशेषतः पावसाळ्याच्या उंबरठ्यावर असताना रस्ता खड्डेमय अवस्थेत असून, गाडी चालवणे म्हणजे जिवाशी खेळ करण्यासारखं झालं आहे.गावकऱ्यांचा एकच थेट सवाल – "ठेकेदारांनी रस्ता सुरू करताना N.O.C. घेतली का? जर अपघात झाला, तर जबाबदार कोण?"ही चर्चा गावागावात रंगू लागली आहे. रस्ता बेकायदेशीर पद्धतीने सुरू झाला की काय, अशी गंभीर शंका नागरिक व्यक्त करत आहेत.
अपघाताला आमंत्रण , दैनंदिन हाल या रस्त्यावरून रोज प्रवास करणारे दूधवाले, भाजी विक्रेते, शालेय विद्यार्थ्यांसह सर्वसामान्य प्रवासी यांचे अक्षरशः हाल होत आहेत.दुचाकीस्वार खड्ड्यांमुळे घसरून पडत आहेत,चारचाकी गाड्या चिखलात अडकत आहेत,रस्त्यावर माहिती फलक नाही,पर्यायी मार्गाचीही कोणतीच व्यवस्था नाही.कायद्याचं उल्लंघन?ग्रामस्थ आणि काही स्थानिक नेत्यांनी सांगितले की, ठेकेदाराने काम सुरू करण्याआधी कोणतीही योग्य पूर्वतयारी केली नाही. विशेषतः N.O.C. मिळवण्यासारख्या कायदेशीर बाबीकडे ठेकेदाराने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केलं असून, हे "कंत्राटी राजकारण" नागरिकांच्या जीवावर उठत असल्याची भावना सर्वत्र आहे.
प्रशासन गप्प का?संतप्त ग्रामस्थांनी आता स्थानिक लोकप्रतिनिधींना आणि जिल्हा प्रशासनाला ठेकेदारांविरोधात तक्रार दाखल करण्याचा निर्धार केला आहे."जर अपघात झाला, तर ठेकेदार आणि प्रशासन यांना गाफील धरलं जाईल," अशी स्पष्ट मागणी नागरिक करत आहेत.

## लिंबागणेश पोलिस चौकीतील पोलिस कर्मचाऱ्यांना पोलिस मित्रांच्या वतीने निरोप समारंभ, नविन कर्मचाऱ्यांचे स्वागत...

दैनिक युवक आधार
पाटोदा (प्रतिनिधी)


लिंबागणेश पोलिस चौकीतील जुन्या सर्वच कर्मचाऱ्यांची बदली झाल्याने नव्याने रूजू झालेले पोलिस हेड कॉन्स्टेबल बडे, राख, शेलार आणि राऊत यांचे शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

– बीड तालुक्यातील नेकनुर पोलिस स्टेशन अंतर्गत लिंबागणेश पोलिस चौकीतील बदली झालेल्या पोलिस हेडकॉन्स्टेबल संतोष राऊत, बाबासाहेब डोंगरे, नवनाथ मुंढे, एम.तांदळे यांचा पोखरी (घाट) चे सरपंच बिभीषण मुळीक, महाजनवाडीचे सरपंच विश्वंभर गिरी यांच्या प्रमुख उपस्थित दि.०६ जुन-२०२५ शुक्रवार रोजी पोलिस मित्र ग्रुप लिंबागणेश यांच्या वतीने ग्राम पंचायत कार्यालय लिंबागणेश येथे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. या वेळी कार्यक्रमाची प्रस्तावना व सूत्रसंचालन पत्रकार हरीओम क्षीरसागर यांनी केले तर आभार प्रदर्शन ग्राम पंचायत सदस्य अशोक जाधव यांनी केले. या वेळी कार्यक्रमास आवर्जून उपस्थित विश्वंभर गिरी, ग्राम पंचायत सदस्य समीर शेख यांनी मनोगत व्यक्त केले. तर सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी पोलिस कर्मचारी यांनी केलेल्या प्रशंसनीय कामाचा लेखाजोखा मांडत ग्रामस्थांच्या वतीने कृतज्ञता व्यक्त करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. बदली झालेल्या कर्मचाऱ्यांनी आपल्या कार्यकाळात आलेले अनुभव मांडत ग्रामस्थांनी केलेल्या सहकार्याबद्दल व निरोप समारंभाबद्दल आभार मानले. पोलिस अधीक्षक बीड नवनीत कांवत यांनी बीड मधील पोलिस दलामध्ये फेरबदल करत दि.२१ मे रोजी ६०६ पोलिस कर्मचाऱ्यांच्या बदल्या केल्या. या बदल्यांमध्ये पोलिस हेडकॉन्स्टेबल ते उपनिरीक्षक या स्तरावरील कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. नेकनुर पोलिस ठाणे अंतर्गत लिंबागणेश पोलिस चौकी मधील पोलिस हेड कॉन्स्टेबल संतोष राऊत यांची शिवाजीनगर पोलिस स्टेशन बीड, बाबासाहेब डोंगरे व नवनाथ मुंढे यांची अंबाजोगाई ग्रामीण पोलीस स्टेशन येथे तर मधुकर तांदळे यांची पाटोदा पोलिस स्टेशन येथे बदली करण्यात आली आहे. पोलिस मित्र ग्रुप लिंबागणेश यांच्या वतीने शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा आदरपूर्वक सन्मान करत जड अंतःकरणाने निरोप देण्यात आला. या वेळी माजी सैनिक मारोती रणखांब, सय्यद बशीर, विक्रांत वाणी, अँड.गणेश वाणी, औदुंबर नाईकवाडे, सय्यद अख्तर, बाळु कदम, तुकाराम गायकवाड, तुळशीराम पवार, बालाजी निर्मळ, जितेंद्र निर्मळ, कृष्णा वायभट, योगेश शिंदे, केशव गिरे सह आदी ग्रामस्थांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

**नवनियुक्त पोलिस कर्मचारी यांचे स्वागत**

## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त L&T आणि रायन इंटरनॅशनल स्कूल प्लास्टिकविरहित भविष्यासाठी एकत्र आले

दैनिक युवक आधार
पनवेल, महाराष्ट्र




शाश्वत विकास आणि पर्यावरण संरक्षणाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत, लार्सन अँड टुब्रो (L&T) ने रायन इंटरनॅशनल स्कूलसोबत भागीदारी करून प्लास्टिक प्रदूषण व पर्यावरणपूरक पर्यायांवर केंद्रित एक सशक्त जनजागृती मोहीम आयोजित केली. ही मोहीम रायन इंटरनॅशनल स्कूलच्या परिसरात पार पडली आणि यामध्ये NAINA (नई मुंबई एयरपोर्ट इन्फ्लुएंस्ड नोटिफाइड एरिया) येथील L&T टीचे अधिकारी, शाळेतील शिक्षकवर्ग व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. या उपक्रमाचा उद्देश प्लास्टिकच्या वापरामुळे होणाऱ्या पर्यावरणीय धोक्यांवर प्रकाश टाकणे आणि स्वच्छ व हिरवळयुक्त भविष्याची दिशा दाखवणारे सोपे आणि कृतीशील पर्याय सादर करणे हा होता. या मोहिमेत उत्साही घोषणा, रंगीबेरंगी फलक, आणि सर्जनशील सादरीकरणांनी रंग भरले. उद्योग आणि शैक्षणिक क्षेत्रातील एकत्रित योगदानातून पर्यावरण रक्षणासाठी खालून वर चालणाऱ्या बदलाचा संदेश यामध्ये उमटला. सहभागी सदस्यांना वापरण्यायोग्य पर्यावरणपूरक वस्तू – जसे की काचेच्या बाटल्या, कपडी पिशवी , आणि एक अभिनव "प्लांटेबल" पेन – वापरल्यानंतर झाडात रूपांतरित होणारे पेन – भेट स्वरूपात देण्यात आले. या वस्तू वाढ व पुनर्निर्मितीचे प्रतीक होत्या.
L&T चे NAINA प्रकल्पाचे प्रकल्प संचालक श्री. अजय राय यांनी कार्यक्रमात प्रमुख भाषण करताना युवकांच्या सहभागाचे महत्त्व अधोरेखित केले. "ही मोहीम केवळ प्रतीकात्मक नाही – तर विद्यार्थ्यांना समजून घेऊन कृती करण्यासाठी सक्षम बनवण्याबाबत आहे. खरी बदल घडतो तेव्हा जेव्हा जाणीव कृतीत परिवर्तीत होते," असे ते म्हणाले.
रायन इंटरनॅशनल स्कूलच्या मुख्याध्यापिका श्रीमती लीला वर्मा यांनी अल्पावधीत विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग सुनिश्चित करून कार्यक्रमाची आखणी करण्यात मोलाची भूमिका बजावली. त्यांनी शाळेच्या पर्यावरणीय मूल्यांप्रती असलेल्या निष्ठेचा पुनरुच्चार केला आणि विद्यार्थ्यांच्या आत्मीय सहभागाचे कौतुक केले. हा उपक्रम L&Tच्या पर्यावरणीय बांधिलकीचा आणि रायन इंटरनॅशनल स्कूलच्या शाश्वततेवर आधारित शैक्षणिक तत्त्वज्ञानाचा पुरावा आहे. उद्योग आणि शिक्षण क्षेत्र यांच्यातील एकत्रित प्रयत्नांमुळे पर्यावरण जागरूक पिढी घडवण्यामध्ये कसा प्रभाव पडतो, हे यातून दिसून येते.